मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - अ‍ॅड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०५ ■ मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## () थोडक्यात ()

### बांगलादेशी घुसखोरांना काँग्रेसनेच वसवले!; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची टीका



**दैनिक युवक आधार**

**नामरूप :** काँग्रेस ही देशविरोधी कृत्यात गुंतली असून बांगलादेशातील बेकायदा घुसखोरांना आसाममध्ये वसवण्यास मदत करत आहे, अशी जोरदार टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.दिब्रूगड जिल्ह्यातील नामरूप येथे १०,६०१ कोटी रुपयांच्या खत कारखान्याचे उद्घाटन केल्यानंतर झालेल्या जाहीरसभेत ते बोलत होते. पंतप्रधानांनी सांगितले की, काँग्रेस देशविरोधी कृत्ये करत आहे. त्यांना बांगलादेशातील बेकायदा घुसखोरांना आसामच्या जंगलात आणि जमिनीवर वसवायचे आहे. त्यांचा उद्देश फक्त मतपेटी मजबूत करणे एवढाच आहे; त्यांना जनतेची पर्वा नाही. आसामी लोकांची ओळख, अस्तित्व आणि अभिमान यांची काळजी नाही, जी गोष्ट जपण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे.काँग्रेसने येथील जुन्या कारखान्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठीही काहीच केले नाही, असे ते म्हणाले.मतदार यादींच्या पुनर्विलोकनाला काँग्रेसचा विरोध आहे. कारण त्यांना फक्त सत्ता मिळवायची आहे. जे काही चांगले मी करण्याचा प्रयत्न करतो, त्याला ते विरोध करतात. भाजप सरकार नेहमीच आसामी लोकांची ओळख, जमीन, अभिमान आणि अस्तित्वाचे रक्षण करेल, असे आश्वासन मोदी यांनी दिले. काँग्रेसने देशाचे मोठे नुकसान केले आहे. हे नुकसान भरून काढण्याचे काम गेल्या ११ वर्षांपासून मी करत आहे.

# कल्याण डोंबिवलीत भाजपचा शिंदेंना दे धक्का

## महापालिका स्वबळावर लढणार रविंद्र चव्हाण वक्तव्यावर ठाम

**दैनिक युवक आधार**
**कल्याण, प्रतिनिधी :**

महायुती म्हणून आम्ही राज्यातील महापालिका निवडणुका (Election) एकत्र लढणार आहोत, केवळ पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत युती नसेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुती एकत्र निवडणुकांना सामोरे जाईल असेच चित्र आहे. मात्र, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केडीएमसी (KDMC) निवडणूक स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेसंदेभात केलेल्या वक्तव्यावर भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण (Ravindra Chavan) ठाम आहेत. त्यामुळे, कल्याण डोंबिवलीत भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचे दिसून येत आहे.

कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकांबाबतचं विधान हे विचारपूर्वक केलेलं वक्तव्य असून अर्थ काय काढावा हा तुमचा प्रश्न आहे, असे रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांना उद्देशून म्हटले. कल्याण डोंबिवलीतल्या १०-१० हजार कार्यकर्त्यांमधून केवळ १२२ कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याचं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं होत. त्यामुळे, कल्याण डोंबिवलीत भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



तुम्ही मला प्रत्येक निवडणुकीत विश्वासाने मतदान करता. यावेळेस फक्त एवढीच विनंती आहे की, जो कमळ चिन्हावर उभा राहील त्याला मतदान करा. कामे मार्गी लावण्यासाठी कमळ चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला मतदान करा, केंद्र आणि राज्याप्रमाणे महापालिकेत भाजपचे सरकार आले तर अनेक गोष्टी सहजपणे मार्गी लावता येतील. आपल्याला १०० टक्के एका विचाराचे म्हणजेच भारतीय जनता पार्टीचे सरकार जे केंद्रात आणि राज्यात आहे तेच आणायचे आहे, असेही रविंद्र चव्हाण यांनी नगरपालिका निवडणुकांच्या निकालानंतर बोलताना म्हटले. त्यामुळे, केडीएमसी निवडणुकीत भाजप आणि शिंदेंची शिवसेना स्वतंत्र लढणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

**अंबरनाथ-बदलापूरमध्ये भाजपचं कमळ**

नगरपालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं ग्रामीण महाराष्ट्रात भाजपच्या तोडीस तोड केलेली कामगिरी निकालाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. मात्र, त्याचवेळी एकनाथ शिंदे यांच्या ठाणे या बालेकिल्ल्याला लागून असलेल्या अंबरनाथ आणि बदलापूर नगरपरिषदांमध्ये भाजपने घवघवीत यश मिळवत येथील सत्ता हस्तगत केली. बदलापूर आणि अंबरनाथ नगरपरिषदेतील शिवसेनेचा पराभव हा एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासाठी मोठा झटका ठरला आहे. त्यामुळेच, आता कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीतही भाजपकडून स्वबळाचे संकेत दिले जात आहेत. त्यासाठी, रविंद्र चव्हाण आग्रही असल्याचं त्यांच्या वक्तव्यांवरुन दिसून येते.

# रेल्वेच्या प्रवासी भाड्यात वाढ, २६ डिसेंबरपासून नवे दर लागू

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

भारतीय रेल्वेने लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी भाडेवाढ जाहीर केली आहे. २६ डिसेंबरपासून हे नवीन दरभाडे लागू होतील. २१५ किलोमीटरपेक्षा जास्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता प्रत्येक किलोमीटरसाठी १ ते २ पैसे जादा मोजावे लागणार आहेत. या निर्णयामुळे रेल्वेला सुमारे ६०० कोटी रुपये अतिरिक्त महसूल मिळेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



रेल्वेचा खर्च आणि प्रवाशांवरील खर्चाचा भार याचे संतुलन साधण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे भारतीय रेल्वेने म्हटले आहे. भारतीय रेल्वेने उपनगरी रेल्वेसेवा तसेच मासिक पासच्या दरांमध्येही कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे दैनंदिन प्रवास करणारे नोकरदार, विद्यार्थी आणि उपनगरी प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. याशिवाय ऑर्डिनरी क्लास म्हणजेच जनरल तिकीटावर प्रवास करणाऱ्यांसाठी २१५ किमीपर्यंत कोणतेही दर वाढवण्यात आलेले नाहीत.नव्या भाडे रचनेनुसार, २१५ किमीपेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी तिकीटदरात वाढ करण्यात आली आहे. साध्या (ऑर्डिनरी) वर्गात २१५ किमीपुढील प्रत्येक किमीमागे १ पैसा अतिरिक्त आकारण्यात येणार आहे. तर मेल–एक्स्प्रेस नॉन-एसी आणि एसी वर्गात २१५ किमीपुढील प्रत्येक किमीमागे २ पैसे जादा मोजावे लागणार आहेत. ५०० किलोमीटरपर्यंतच्या अंतरात नॉन एसी कोचमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना १० रुपये अधिक द्यावे लागतील.गेल्या १० वर्षात रेल्वेने नेटवर्क आणि पायाभूत सुविधा वाढवल्या आहेत.

चांगल्या प्रकारची सेवा देण्यासाठी आणि सुरक्षा वाढवण्यासाठी मनुष्यबळ वाढवण्याची गरज आहे.

# माणिकराव कोकाटेंची आमदारकी तूर्तास वाचली, सर्वोच्च न्यायालयाकडून दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

शासकीय कोट्यातून सदनिका लाटल्याप्रकरणी राज्याचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना सर्वोच्च न्यायालयानं मोठा दिलासा दिलाय. याप्रकरणी नाशिक सत्र न्यायालयानं माणिकराव कोकाटे यांना सुनावलेली दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा स्थगित करण्यात आलीय. त्यामुळं याप्रकरणी अंतिम निकाल येत नाही, तोपर्यंत माणिकराव कोकाटे यांची आमदारकी कायम राहणार आहे. दरम्यान, याप्रकरणी माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयानं आधीच अटकेपासून दिलासा देत त्यांना १ लाखांचा जामीन मंजूर केलाय.



**सर्वोच्च न्यायालयात काय घडलं? :** माणिकराव कोकाटे यांच्या वतीनं वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी युक्तिवाद केला. नाशिक सत्र न्यायालयानं माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवल्यानंतर दोन वर्षांचा तुरुंगवास व आर्थिक दंड ठोठावला होता. या शिक्षेविरोधात माणिकराव कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, शिक्षेवर स्थगिती देण्यास उच्च न्यायालयानं नकार दिल्यानं माणिकराव कोकाटे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. माणिकराव कोकोटे यांच्यावतीनं सर्वोच्च न्यायालयात वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी युक्तिवाद केला. सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी सुरू झाली. प्राथमिक युक्तिवादनंतर माणिकराव कोकाटे यांची स्थगितीची मागणी न्यायालयानं मान्य करत, यावर राज्य सरकारला उत्तर देण्याकरिता नोटीस जारी केली. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान माणिकराव कोकाटे यांची आमदारकी अबाधित राहील. मात्र, सुनावणी पूर्ण होईपर्यंत माणिकराव कोकाटे यांना कोणतंही मंत्रिपद, महामंडळाचं प्रमुखपद किंवा इतर कोणतंही अधिकारपद भूषवता येणार नाही, असंही सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलंय.

**मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल काय? :** माणिकराव कोकाटे यांना अंशत: दिलासा देत मुंबई उच्च न्यायालयानं त्यांना गेल्या शुक्रवारी १ लाखांचा जामीन मंजूर केलाय. याप्रकरणी ते आधीच गेली अनेक वर्ष जामीनावर आहेत. ते सिन्नरमधून गेली ५ टर्म आमदार आहेत. तसंच त्यांना दिलेली शिक्षा ही केवळ दोन वर्षांची आहे. त्यामुळं त्यांच्या याचिकेवर अंतिम निकाल येत नाही, तोपर्यंत त्यांच्या अटकेची गरज नाही, असं न्यायमर्ती आर.एन. लद्ढा यांनी आपल्या निकालात म्हटलं. तसंच, नाशिक सत्र न्यायलयानं माणिकराव कोकाटे हे याप्रकरणी दोषी असल्याचा दिलेला मुख्य निकाल मात्र उच्च न्यायालयानं कायम ठेवला. न्याय हा सर्वांना समान असतो, लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राहणं गरजेच आहे. त्यामुळं माणिकराव कोकाटे हे दोषी असल्याचा नाशिक सत्र न्यायालयाचा निकाल उच्च न्यायालयानं कायम ठेवत, त्यात त्यांना कोणताही दिलासा देण्यास नकार दिलाय.

# उत्पादकता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### एल.आय.टी. माजी विद्यार्थी संघटनेचा ‘उडान’ कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**नागपूर, प्रतिनिधी :**

शेतीची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविण्याचे राज्य सरकारने ठरविले असून, येत्या २ वर्षात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती लागवडीखाली येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एल.आय.टी.) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित उडान संमेलनात ते बोलत होते. सत्यनारायण नूवाल आणि पद्मश्री डॉ. डी. के. यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.




यावेळी डॉ. आर. एल. सोनोलिकर, अरुण दांडेकर यांना जीवन गौरव प्रदान करण्यात आला. तसेच लाइफ टाइम अचिव्हमेंट दीपक लव्हाळा यांना, ज्वेल ऑफ एलआयटी डॉ. सुगंधा गारवे, कीर्ती गणोरकर, आर.जी. कृष्णन, अमित सिन्हा, नीरा चंदना यांना, तर युथ आयकॉन पुरस्कार चिंतन शाह यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आज सर्वच क्षेत्रात एआयचा वापर होतो आहे. ती काळाची गरज आहे, त्यामुळे एल आय टी सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात एआयचा स्वीकार करावा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले की, हे झाले तर जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी आपण विद्यार्थी घडवू शकू.

फक्त अभ्यासक्रमांनी शिक्षण संस्था मोठी होत नाही, तर ती मोठी होते ती तिच्या विद्यार्थ्यांमुळे, असे पद्मश्री डॉ. यादव यावेळी म्हणाले. नैसर्गिक दृढ संकल्प असेल तर कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते, असे सत्यनारायण नूवाल यांनी सांगितले.

रावबहादूर डी. लक्ष्मी नारायण यांना लक्ष्मीनारायण गीताद्वारे अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक एलआयटी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माधव लाभे यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत माधव लाभे यांनी केले. सत्यनारायण नूवाल यांचे स्वागत कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी, तर पद्मश्री डॉ. यादव यांचे स्वागत मोहन पांडे यांनी केले. संघटनेच्या स्मरणिकेचे प्रकाशन अतिथींच्या हस्ते झाले. राकेश गुप्ता, उत्कर्ष खोपकर, मोहन पांडे यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन सचिन पळसोडकर आणि मिली जुनेजा यांनी केले. आभार डॉ. वैद्य यांनी मानले.

# 'दिगंतारा' करणार अंतराळातील क्षेपणास्त्रांचे ट्रॅकिंग ; उपग्रहांच्या मदतीने ठेवणार नजर

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

सध्या युद्ध अत्यंत आधुनिक झाली आहेत. हवाई दलासोबतच क्षेपणास्त्रांचा मुबलक वापर सध्याच्या युद्धात केला जातो. काही देशांनी आपले अंतराळ सैन्य तयार केली आहेत. त्यामुळे प्रत्येक देशाला अंतराळातून हल्ल्याची भीती आहे. या अंतराळातून येणाऱ्या क्षेपणास्त्रांचे ट्रॅकिंग ‘दिगंतारा’ हे स्टार्टअप करणार आहे.‘दिगंतारा’ हे सध्या अंतराळातील कचऱ्याचे निरीक्षण करते. या क्षेत्रात त्यांनी विशेष कौशल्य मिळवले आहे. आता उपग्रहांच्या मदतीने क्षेपणास्त्रांचे ट्रॅकिंग करण्याच्या क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला आहे. जगभरातील सरकारांकडून वाढत्या मागणीमुळे कंपनी आता नवीन क्षेत्रात पदार्पण करत आहे.कंपन्या उच्च-गती इंटरनेट आणि पृथ्वी निरीक्षणासाठी ‘लो-अर्थ ऑर्बिट’मध्ये मोठ्या प्रमाणावर उपग्रह प्रक्षेपित करत असल्याने अवकाशकचरा आणि वाहतूक निरीक्षण हे जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र बनले आहे.‘आम्ही अत्यंत वेगाने हालचाल करणाऱ्या अवकाशातील वस्तूंचे निरीक्षण करत होतो. त्या अनुभवातून आणि त्यातून शिकलेल्या धड्यांच्या आधारे, त्याच आर्किटेक्चरचा वापर करून आम्ही अंतराळातून क्षेपणास्त्र ट्रॅकिंग आणि डिटेक्शनवर काम करणार आहोत,’ असे ‘दिगंतारा’ इंडस्ट्रीजचे सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध शर्मा यांनी सांगितले.



कंपनीची एकात्मिक पायाभूत रचना प्रगत हार्डवेअर, डेटा आणि प्रक्रिया क्षमतांना एकत्र आणते, ज्यामुळे अवकाश आणि जमिनीवरील प्रणालींना बहुविभागीय निरीक्षणाची क्षमता प्राप्त होते. या अवकाश व जमीन संरचनेत विविध प्रणालींच्या एकत्रीकरणामुळे उदयोन्मुख धोक्यांचे जवळपास रिअल-टाइम अधिग्रहण, विश्लेषण आणि व्याख्या शक्य होते.बेंगळुरूस्थित या स्टार्टअपने अमेरिकेत कामकाज सुरू केले आहे, जिथे १०० किलो वर्गातील मोठे उपग्रह आणि अवकाशयान अमेरिकन संरक्षणाच्या गरजा विशेषतः क्षेपणास्त्र निरीक्षण—ध्यानात घेऊन विकसित केले जात आहेत. आता क्षेपणास्त्रांशी संबंधित बाबी सिंगापूर, थायलंड आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या छोट्या बाजारांनाही सेवा देतात. परंतु, अमेरिकेच्या संरक्षण विभागाकडून ऑर्डर्स मिळवण्यासाठी अमेरिकेत समर्पित कार्यालय आणि टीम आवश्यक आहे,” असे सांगत शर्मा यांनी कोलोरॅडो स्प्रिंग्समध्ये कार्यालय सुरू करण्याची गरज अधोरेखित केली.

## जासई विद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त स्वच्छता अभियान



**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई या विद्यालयात शनिवार दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी इयत्ता पाचवी ब च्या विद्यार्थ्यांनी संत गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम शाळेचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंदावनी केले. गाडगे महाराजांच्या विषयी माहिती सांगण्यासाठी इयत्ता पाचवी ब च्या विद्यार्थ्यांनी कुमारी कोकरे आरोही, चव्हाण आचल, मंसूरी हुसेन या विद्यार्थ्यांनी संत गाडगे महाराज यांच्या विषयी माहिती सांगितली तसेच इयत्ता पाचवी ब च्या विद्यार्थ्यांनी गाडगे महाराजांचे गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपाळा या गीताचे गायन केले. सध्या शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी आपले अध्यक्ष भाषण केले या पुण्यतिथीचे औचित्य साधून शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली .शाळेचा शाळेच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून घेतला स्वच्छते संदर्भात घोषवाक्य यांचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पाचवी ब ची विद्यार्थिनी कुमारी पुकळे प्रीती या विद्यार्थिनी केले. शेवटी अध्यक्षांच्या वतीने हा कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले.

# मृणालताई नाट्यकरंडक स्पर्धेत 'जब वी Meta' सर्वोत्कृष्ट

## 'स्वातंत्र्य सौभाग्य' द्वितीय, 'प्रतीक्षायान' ठरली लक्ष्यवेधी !

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** एकांकिका स्पर्धांच्या विश्वात अल्पावधीतच नावलौकिक मिळवलेल्या मृणालताई नाट्यकरंडक खुल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा भव्य अंतिम सोहळा नुकताच बोरिवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्य मंदिरात उत्साहात पार पडला. या स्पर्धेत म. ल. डहाणूकर महाविद्यालयाच्या 'जब वी Meta' या एकांकिकेने सर्वोत्कृष्ट एकांकिकेचा मान पटकावला, तर मुलुंड कॉमर्स महाविद्यालयाच्या 'स्वातंत्र्य सौभाग्य' या एकांकिकेला द्वितीय क्रमांक मिळाला. 'प्रतीक्षायान' (नाट्यस्पर्श व भवन्स महाविद्यालय) या एकांकिकेला लक्ष्यवेधी एकांकिकेचा पुरस्कार देण्यात आला.



मृणालताई नाट्यकरंडक २०२५ या खुल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीला मराठी रंगभूमी तसेच सिने-मालिका विश्वातील कलाकार, दिग्दर्शक व तंत्रज्ञांची उपस्थिती लाभली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार युवराज मोहिते तसेच कवयित्री नीरजा यांनीही उपस्थित राहून स्पर्धकांचे मनोबल वाढवले.

अंतिम फेरीचे परीक्षण ज्येष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरे, नाट्यकर्मी रमेश मोरे आणि चिन्मयी सुमित यांनी केले. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला होता. त्यामधून निवड झालेल्या सहा दर्जेदार एकांकिकांनी अंतिम फेरीत सादरीकरण केले. त्यामध्ये 'थिमक्का' (ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे), 'कारण काय' (मिथक, मुंबई), 'स्वातंत्र्य सौभाग्य' (मुलुंड कॉमर्स महाविद्यालय), 'जब वी Meta' (म. ल. डहाणूकर महाविद्यालय), 'प्रतीक्षायान'(नाट्यस्पर्श व भवन्स महाविद्यालय) आणि 'स्वस्तिकाची ट्रॅजेडी' (नाट्यपरिवार, ठाणे) या एकांकिकांचा समावेश होता.

उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ नेत्या मृणालताई गोरे यांच्या कन्या अंजली वर्तक आणि कवयित्री नीरजा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. विजेत्या संघांना मकरंद अनासपुरे, रमेश मोरे व चिन्मयी सुमित यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.मृणालताई नाट्यकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन सुदेश सावंत यांच्या 'सोहम थिएटर' तर्फे करण्यात येते. यंदा स्पर्धेचे आठवे वर्ष असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही नाट्यरसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# भक्तीची शक्ती अन् घामाची प्रचिती !

## पालोदच्या शिवारात नरेंद्राचार्यजी महाराजांच्या प्रेरणेतून 'जलक्रांती'

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** अध्यात्म जेव्हा सामाजिक बांधिलकीची जोड घेते, तेव्हा गावचा कायापालट होतो याचा आदर्श वस्तुपाठ सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील ग्रामस्थांनी घालून दिला आहे. जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संकल्पनेतून आणि प्रेरणेतून पालोद येथील भाविकांनी कोणत्याही शासकीय निधीची वाट न पाहता, केवळ लोकसहभागातून व श्रमादानातून 'वनराई बंधारा' उभारला आहे. भक्ती आणि



शक्तीचा हा अनोखा संगम आज संपूर्ण जिल्ह्यात कौतुकाचा विषय ठरला आहे.वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचे चटके बसण्यापूर्वीच पालोद वासियांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा नारा दिला. 'सत्संग सेवा समिती'च्या पुढाकाराने आयोजित या श्रमयज्ञात गावाने आपले सर्व भेद विसरून सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, सकाळच्या सत्रात सुरू झालेल्या या कामात अबालवृद्धांसह महिलांनीही मोठ्या उत्साहाने हातात फावडे-टोपले घेतले. सिमेंटच्या रिकाम्या गोण्यांमध्ये माती आणि वाळू भरून नदीपात्रात एक मजबूत भिंत उभी करण्यात आली. एकाच दिवसात पूर्ण झालेल्या या वनराई बंधाऱ्यामुळे आता वाया जाणारे पाणी अडवले जाणार आहे. या उपक्रमामुळे परिसरातील विहिरींच्या पाणी पातळीत मोठी वाढ होणार असून, शेतीसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. "अध्यात्म केवळ नामात नाही तर कर्मातही असावे," हा संदेश यातून अधोरेखित झाला आहे. शासकीय मदतीची अपेक्षा न करता लोकचळवळीतून उभारलेला हा बंधारा केवळ पाणी साठवण्यासाठी नसून, तो पालोदच्या ऐक्याचे प्रतीक बनला आहे. ग्रामस्थांच्या या 'जलक्रांती'चे कौतुक आता सिल्लोड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून होत आहे.

## विज्ञान प्रदर्शनात जे एम म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या हिमांशू पाटील शाळेने पटकावली चॅम्पियन्स ट्रॉफी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** शिक्षण विभाग पंचायत समिती, खालापूर व तालुका गणित–विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे तालुका विज्ञान प्रदर्शन, खालापूर (२०२५–२६) "विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी STEM" या संकल्पनेअंतर्गत १८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या प्रदर्शनात जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था, पनवेल संचलित हिमांशु दिलीप पाटील इंग्रजी माध्यम शाळा, खालापूर यांनी गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये उत्कृष्ट सादरीकरण केल्यामुळे विज्ञान प्रदर्शनामधील चॅम्पियन्स ट्रॉफी मिळवली.संदिप कराड, गटविकास अधिकारी पं. स. खालापूर, दीपा परब-गवस, गटशिक्षणाधिकारी पं. स. खालापूर, शिल्पा पवार-दास वरिष्ठ विस्तार अधिकारी




पं.स.खालापूर, जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या ममता प्रितम म्हात्रे व सुनीता दिलीप पाटील या प्रमुख मान्यवर म्हणून बक्षीस समारंभासाठी उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष म्हणून या यशाचा अभिमान असल्याचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी म्हटले आहे.

## घटस्फोट घेतल्याचे सांगून महिलेची फसवणूक; लैंगिक अत्याचार करून पैसेही लुबाडले

**दैनिक युवक आधार**


**पनवेल, ( वार्ताहर ) :** लग्न जुळवणाऱ्या साईटवर. घटस्फोटित असल्याची माहिती देऊन पनवेलमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने अलिबाग परिसरात राहणाऱ्या एका महिलेला लग्नाची मागणी घालून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली. विशेष म्हणजे या व्यक्तीने पीडित महिलेची आर्थिक व भावनिक फसवणूक केल्याचे देखील उघडकीस आले. रोहन चिंतामण शिंदे (३८) असे त्याचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याकडे वर्ग केला आहे. रोहन शिंदे याने या लग्न जुळवणाऱ्या साईटच्या माध्यमातून पीडित महिलेच्या प्रोफाईलवर संपर्क साधत गोड बोलून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवत गेल्या चार महिन्यात पनवेलमधील दोन लॉजमध्ये नेऊन तसेच तिच्या घरी जाऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध निर्माण केले. या कालावधीत त्याने पीडित महिलेच्या मोबाईलमध्ये लोन ॲप डाउनलोड करून तिच्या नावावर परस्पर कर्ज घेतले,एवढेत नव्हेतर सिनेमागृहात चित्रपट पाहत असताना तिच्या गळ्यातील सोनसाखळी काढून घेतल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्यानंतर रोहन याने त्याच्या पत्नीशी घटस्फोट घेतला नसल्याचे पीडित महिलेच्या लक्षात आले असता तिने खांदेश्वर पोलीस ठाण्यात रोहनविरोधात तक्रार दाखल केली.

त्यानुसार खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मात्र गुन्ह्याचे घटनास्थळ पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत येत असल्याने त्यांनी हा गुन्हा पनवेल शहर पोलिसांकडे वर्ग केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## उदगीरमध्ये घरगुती गॅसची अवैध विक्री ; अतिरिक्त ३० रुपयांची बेकायदेशीर वसुली सुरू ; पुरवठा अधिकारी / कर्मचारी मुंग गिळुण गप्प का .... ?

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे) :** उदगीर शहरात घरगुती स्वयंपाक गॅसचा सर्रास गैरवापर होत असून, हॉटेल, मंगल कार्यालये, चायनीज गाड्या तसेच खाद्य व्यवसाय करणाऱ्या अनेक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने घरगुती सिलिंडरचा वापर केला जात आहे. याशिवाय ग्राहकांना होम डिलिव्हरी देताना अधिकृत गॅस किमतीव्यतिरिक्त प्रत्येकी ३० रुपयांची अतिरिक्त वसुली केली जात असल्याचे उघड झाले आहे. या गंभीर प्रकाराकडे पुरवठा विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.उदगीर शहर व तालुक्यातील अनेक भागांत घरगुती वापरासाठी उपलब्ध





असलेला एलपीजी गॅस मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक वापरासाठी वळवला जात आहे. शासनाकडून अनुदान देऊन दिला जाणारा घरगुती गॅस केवळ घरगुती वापरासाठी असताना, प्रत्यक्षात तो हॉटेल, मंगल कार्यालये, चायनीज गाड्या, खानावळी तसेच विविध खाद्य स्टॉलवर खुलेआम वापरला जात आहे. नियमांनुसार अशा ठिकाणी व्यावसायिक गॅस सिलिंडर वापरणे बंधनकारक असतानाही संबंधित नियमांकडे दुर्लक्ष केले जात आहे. उदगीर येथील मोठी असलेली गॅस वितरकाकडून ग्राहकांना सिलिंडरची होम डिलिव्हरी देताना अधिकृत दरापेक्षा प्रत्येकी ३० रुपयांची वेगळी रक्कम आकारत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. ही रक्कम कोणतीही पावती न देता घेतली जात असून, वाहतूक खर्च किंवा इतर शुल्क अशा नावाखाली बेकायदेशीर वसुली केली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. शहरातील अनेक ठिकाणी अवैध वापर उघडपणे दिसत असतानाही पुरवठा विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे. अचानक तपासण्या, सिलिंडर जप्ती किंवा दंडात्मक कारवाई क्वचितच होत असल्याने संबंधित व्यावसायिकांना मोकळे रान मिळाले आहे. याचा थेट परिणाम शासनाच्या अनुदान योजनेवर होत असून, खऱ्या गरजू ग्राहकांवर त्याचा बोजा पडत आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून अवैध विक्री, घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर आणि अतिरिक्त वसुली करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी उदगीरमधील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## पनवेल मतदारयादीतील घोळ चव्हाट्यावर..! तोंडरे गावातील एका वडिलांना २६८ मुले ?; याचिका दाखल होणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** पनवेल महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया सुरू असतानाच प्रभाग क्रमांक २ मधील अंतिम मतदार यादीत उघड झालेल्या धक्कादायक घोळामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. एका व्यक्तीच्या नावाखाली तब्बल २६८ मुलांची नोंद आढळून आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर, या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले असून शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी थेट उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली आहे.महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना नुकतीच अंतिम मतदार यादी उपलब्ध करून देण्यात आली. त्याच दरम्यान ही धक्कादायक बाब उघडकीस आली. एका



वडिलांच्या नावाखाली असामान्य संख्येने मुलांची नोंद आढळल्याने मतदार यादीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत अरविंद म्हात्रे यांनी नमूद केले आहे की, या २६८ नावांपैकी बहुसंख्य तरुण हे उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील असून, संबंधित व्यक्ती प्रत्यक्षात पनवेलमध्ये वास्तव्यास नाहीत. तरीही त्यांची नावे एकाच पत्त्यावर मतदार म्हणून नोंदवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार केवळ प्रशासकीय चूक नसून, आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आलेला गंभीर गैरप्रकार असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेद्वारे अरविंद म्हात्रे यांनी उच्च न्यायालयाकडे संबंधित मतदार यादीची तातडीने सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, बनावट व संशयास्पद नोंदी तत्काळ रद्द कराव्यात, तसेच या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर व संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. दरम्यान, पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मधील अंतिम मतदारयादीतून पूर्वश्रीत १४०० मतदाराची नावे वगळण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.निवडणुकीच्या तोंडावरच असा प्रकार उघडकीस आल्याने पनवेलमध्ये राजकीय वातावरण तापले असून, मतदार यादीसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियेवर प्रशासनाचा कितपत ताबा आहे, याबाबत नागरिकांमध्ये तीव्र चर्चा सुरू आहे. लोकशाहीचा पाया मानल्या जाणाऱ्या मतदार यादीतच अशा स्वरूपाचा घोळ आढळणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

> **एका वडिलांना २६८ मुले दाखवणे म्हणजे मतदार यादीची थट्टा असून लोकशाही प्रक्रियेचा थेट अपमान आहे. बाहेरील लोकांची नावे मतदार यादीत घालून निवडणुकीत गैरव्यवहार करण्याचा हा प्रयत्न आहे.**
>
> **अरविंद म्हात्रे, याचिकाकर्ते**

## ग्लोबल फाउंडेशन यांचे वतीने "Visit My Police Station " या उपक्रमासाठी महाराष्ट्र मधुन प्रथम पोलीस आयुक्तालय ठाणे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी** :महाराष्ट्र विधी प्राधिकरण मुंबई श्रीमती रेवती ढेरे यांचे अध्यक्षतेखाली व ग्लोबल फाउंडेशन यांचे वतीने "Visit My Police Station " या उपक्रमासाठी महाराष्ट्र मधुन प्रथम पोलीस आयुक्तालय ठाणे यांची निवड करण्यात आली होती .सर्वसामान्य नागरिकांना पोलीसांचे कामकाज , पोलीस ठाणे विषयी असलेले गैरसमज, वगैरे इ. समन्वय साधणे व पोलीस दलाप्रती विश्वास वाढविणेकरिता प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीतील प्रतिष्ठित , वरिष्ठ , सर्व पोलीस कमिटी , शाळा , कॉलेज , कलाकार , डॉक्टर अशा जास्तीत जास्त नागरिकांना पोलीस ठाणे भेट देऊन सहभागी करून माहिती देणेत आली . ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात "Visit My Police Station" कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. ठाणे न्यायलय येथे मा.आगरवाल , मुख्य न्यायाधिश , ठाणे न्यायालय , आशुतोष डुंबरे



पोलीस आयुक्त, ठाणे शहर व इतर मान्यवरांचे उपस्थितित पारितोषिक समारंभ पार पडला ठाणे पोलीस आयुक्तालयातील कासारवडवली पोलीस ठाणेस द्वितीय क्रमांक मिळाला .

यावेळी वपोनि एन . बी . कोल्हटकर यांनी स्वीकारला यावेळी सुप्रसिद्ध मराठी अभिनेते मंगेश देसाई हे सुद्धा उपस्थित होते .

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# परतूर नगरपरिषदेवर भाजपचा झेंडा

**दैनिक युवक आधार**

**जालना(अशोक ठोके) :** परतूर नगरपरिषदेची मतमोजणी जवाहर नवोदय विद्यालय,आंबा येथेअतिशय शांततेत पार पडली. प्रियंका शहाजी राक्षे या भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक रिंगणात उतरल्या होत्या त्या नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. मतदारांनी नगराध्यक्ष पद भाजपला दिले मात्र मतदारांनी नगरसेवक पदासाठी संमिश्र कौल दिल्याचे चित्र निकालानंतरच्या पक्षीय बलाबलावरून स्पष्ट झाले आहे.भारतीय जनता पक्षाच्या प्रियांका राक्षे यांनी नगराध्यक्ष पदी निवडून येत इतिहास घडवला. जनते मधून निवडून येणाऱ्या त्या भाजपच्या पहिल्या महिला नगराध्यक्ष ठरल्या आहेत हे विशेष.



नगराध्यक्ष पदी भाजपला संधी देताना विविध प्रभागामधून वेगवेगळ्या पक्षाचे उमेदवार निवडून येतील याचीही काळजी मतदारांनी घेतली. 23 सदस्य संख्या असलेल्या येथील नगरपरिषदेत आता भारतीय जनता पक्षांचे 6, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे 6,राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे 5, काँग्रेसचे 3 व शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे 3 असे पक्षीय बलाबल आहे.

या निवडणुकीचे आणखी एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे शिवसेना शिंदे गटाला एकही जागा जिंकता आली नाही. नगराध्यक्ष पदासह सर्व प्रभागातील नगरसेवक पदाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. पक्षाचे मोहन अग्रवाल यांनी मागील काही काळात शहरात रस्ते, पथदिवे, सभामंडप ही व इतर अनेक कामे केली मात्र तरीही त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

दरम्यान निवडून आलेल्या उमेदवारात प्रभाग क्रमांक 1 अ मधून श्रीमती रत्नमाला सतीश सोनवणे व ब मधून इम्रान कुरेशी हे दोन्ही भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून आले आहेत. तसेच वार्ड क्रमांक 2 अ मधून शरद पवार गटाचे ऋषिकेश बापुराव कऱ्हाळे हे विजयी झाले आहेत तसेच ब गटातून भारतीय जनता पार्टीच्या श्रीमती स्नेहा सोनू अग्रवाल या विजयी झाल्या आहेत तसेच प्रभाग क्रमांक 3 अ मधून अजित दादा पवार गटाचे शाकीरोउद्दीन खतीब हे विजयी झाले आहेत व ब गटातून शरद पवार गटाच्या श्रीमती तय्यबा फातेमा अखिलउद्दिन काझी विजयी झाल्या आहेत. प्रभाग क्रमांक 4 अ मधून श्रीमती अन्सारी रुबीना मोहम्मद मुस्ताक या काँग्रेस पार्टी कडून विजयी झाल्या आहेत तर ब गटातून श्री शेख कदिरअब्दुल्ला हे काँग्रेस गटाकडून विजयी झाले आहेत प्रभाग क्रमांक 5 अ मधून सय्यद तहसीम बेगम सय्यद अक्रम या अजितदादा पवार गटाकडून विजयी झाल्या आहेत. तर ब गटातून कुरेशी रज्जाक लतीफ हे काँग्रेस पक्षाकडून विजयी झाले आहेत. वार्ड क्रमांक 6 अ मधून श्रीमती शिला संजय राऊत या शरद पवार गटाकडून विजयी झाल्या आहेत तर ब मधून प्रकाश चव्हाण हे भारतीय जनता पार्टी कडून विजयी झाले आहेत. प्रभाग क्रमांक 7अ मधून तौशिफ सज्जाद शेख हे शरद पवार गटाकडून विजयी झाले असून 7 ब मधून श्रीमती तेलगड सरस्वती अंकुशराव हे शरद पवार गटाकडून कडून विजयी झाल्या आहेत तर 8 अ मधून प्रदीप सुधाकरराव सातोनकर हे भारतीय जनता पार्टी कडून विजयी विजयी झाले आहेत तर 8 ब मधून श्रीमती विशाखा विजय राखे या शरद पवार गटाकडून विजयी झाल्या आहेत. प्रभाग क्रमांक 9 अ मधून श्रीमती काळे पूजा सावता या भारतीय जनता पार्टी कडून विजयी झाल्या आहेत तर 9 ब मधून नळगे गणेश रामेश्वर हे शिवसेना उबाठा गटाकडून विजयी झाले आहेत. प्रभाग क्रमांक 10 अ मधून कल्पना मंगेश डहाळे या अजितदादा पवार गटाकडून विजयी झाल्या आहेत तर 10 ब मधून श्रीमती मीरा विश्वनाथ कदम या शिवसेना उबाठा गटाकडून विजयी झाल्या आहेत

तसेच प्रभाग क्रमांक १० क मधून राजेश रामगोपाल खंडेलवाल हे अजित दादा पवार गटाकडून विजयी झाले आहेत. प्रभाग क्रमांक 11अ मधून बाबुराव नाथाजी हिवाळे हे अजितदादा गटाकडून विजयी झाले आहेत तर 11 ब मधून श्रीमती माधवी संतोष पवार ह्या शिवसेना उबाठा गटाकडून विजयी झाल्या आहेत.

## गव्हाण हायस्कूलमध्ये ग्रामस्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी. भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण कोपर विद्यालयात शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक श्री विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका सौ शशिकला पाटील मॅडम, संस्थेचे लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, पालक प्रतिनिधी साईनाथ मोकल आणि सर्व शिक्षक वृंदांनी संत शिरोमणी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. सर्व विद्यार्थ्यांनी 'गोपाळा गोपाळा,देवकी नंदन गोपाळा' या भजनाचे गायन केले.

यानंतर वर्षभरासाठी प्रत्येक वर्गातील स्वच्छता दुत म्हणून नेमणूक केलेल्या विद्यार्थ्यांनी कोपर गावातील प्रसिध्द हनुमान मंदिर व मंदिरा सभोवतालच्या परिसराची स्वच्छता केली.



हाती खराटे झाडू घेवून विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानात उत्साहाने सहभाग घेवून स्वच्छता केली. आनंदाची बाब अशी की या स्वच्छता अभियानात कोपर गावातील ग्रामस्थांनी देखील सहभाग घेतला. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते श्री सुधीर ठाकूर,कोपरगाव अध्यक्ष श्री वैभव घरत, श्री सुहास देशमुख, सौ.जयश्री पाटील ,सौ कांता पाटील आणि इतर ग्रामस्थ बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या सौ ज्योत्स्ना ठाकूर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. ग्रामस्वच्छता अभियान यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सेवकांनी मेहनत घेतली.

## महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्यापैकी जो आमच्या पक्षाला सन्मानाची वागणूक देईल त्याच पक्षाला पाठिंबा देणार - स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक महेश साळुंखे यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. या बैठकीमध्ये पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावेळी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी महेश साळुंखे यांना पाठिंबा देण्याबाबतचे सर्व अधिकार दिलेले आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अशीही मागणी केलेली आहे की महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्यापैकी जो आपल्या पक्षाला सन्मानाची वागणूक देईल त्याच पक्षाला पाठिंबा देण्यात यावा अन्यथा अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्यात यावा.

पनवेल महानगरपालिकेच्या 20 वार्डांपैकी 18, 19, 20 या वार्डांमध्ये पक्षाची चांगल्या प्रकारची ताकद आहे आणि ही ताकद उमेदवार निवडून आणण्याकरिता निर्णायक मतदार ठरू शकतात. त्याचप्रमाणे कामोठे विभाग , खांदा कॉलनी, नवीन पनवेल , कळंबोली या ठिकाणी सुद्धा पक्षाची चांगल्या प्रकारची ताकद आहे. जर पक्षाच्या कार्यकर्त्यांना या निवडणुकीमध्ये सन्मानाची वागणूक मिळाली नाही तर पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून महेश साळुंखे जो निर्णय घेतील तो पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना मान्य राहणार आहे अशी ग्वाही सर्व कार्यकर्त्यांनी



दिलेली आहे. लवकरच महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्यापैकी कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी दोन्ही गटाच्या वरिष्ठांशी महेश साळुंखे चर्चा करत आहेत आणि लवकरच कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी निर्णय साळुंखे जाहीर करतील. या बैठकीमध्ये . अध्यक्ष, पनवेल विधानसभा मतदारसंघ. निलेश कांबळे, अध्यक्ष, पनवेल तालुका दिलीप नाईक,,उपाध्यक्ष पनवेल तालुका नरेश परदेशी ,अध्यक्ष पनवेल शहर मनोज कांबळे अध्यक्ष नवीन पनवेल विभाग किशोर कदम, अध्यक्ष कामोठे शहर विभाग अरुण जाधव ,अध्यक्ष महिला आघाडी पनवेल शहर ममताज पठाण,उपाध्यक्ष पनवेल शहर भारत दाताड ,अध्यक्ष अल्पसंख्यांक सेल पनवेल शहर आसिफ शेख ,उपाध्यक्ष महिला आघाडी पनवेल शहर निशा कोळी ,संघटक पनवेल शहर समाधान कांबळे ,उपाध्यक्ष नवीन पनवेल विभाग अशोक कदम ,सरचिटणीस पनवेल शहर मयूर गायकवाड ,संघटक पनवेल तालुका चंद्रकांत वेळासकर, उपाध्यक्ष पनवेल विधानसभा मतदारसंघ प्रशांत सोनवणे ,संघटक पनवेल विधानसभा मतदारसंघ अनिल वामने व महिला आघाडीच्या सुमन पाटील व फातिमा या उपस्थित होत्या.

## दिव्यांगांच्या हक्कांना संरक्षण : रायगड जिल्हाधिकारी बैठकीत ऐतिहासिक निर्णय

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड :** रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. जिल्हाधिकारी किसनराव जावळे यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत दिव्यांग प्रमाणपत्र डिजिटलायझेशनदरम्यान टक्केवारी कमी केली जाणार नाही, असा ठोस निर्णय जाहीर करण्यात आला.

प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेने हा मुद्दा ठामपणे मांडत मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयासह केंद्र सरकारचे गॅझेट सादर केले. जिल्हाधिकाऱ्यांनी डिजिटलायझेशन म्हणजे केवळ नोंदी ऑनलाइन करणे असून, जुने वैध प्रमाणपत्र बदलता येणार नाही, असे स्पष्ट



केले व याबाबत लेखी निर्देश देण्याचे आश्वासन दिले.

बैठकीत दिव्यांगांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यांच्या अडचणी, एस.टी. महामंडळातील दिव्यांग आरक्षित सीट्स, ई-रिक्षा वाटपातील अनियमितता, दिव्यांगांसाठी चार चाकी वाहन धोरण, तसेच दिव्यांग विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांवर चर्चा झाली. दोषींवर कारवाई करण्याचे व नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.यासोबतच दिव्यांगांसाठी ५ टक्के निधी, तहसील कार्यालयातील समस्या, उत्पन्नाचे दाखले व सन्मानाची वागणूक या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

यापुढे दर सहा महिन्यांनी जिल्हाधिकारी दिव्यांगांसोबत थेट बैठक घेतील, असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले.ही बैठक दिव्यांगांच्या हक्कांचे संरक्षण करणारी व दिलासादायक ठरली असून, निर्णयांची अंमलबजावणी लवकरच होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## थोर गणित तज्ञ श्रीनिवास रामानुज यांच्या जयंतीनिमित्त गणित साहित्याचे प्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई या विद्यालयांमध्ये वार सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात थोर गणित तज्ञ श्रीनिवास रामानुज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका माननीय सौ के. जी. म्हात्रे मॅडम शाळेचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या




अध्यक्षा सौ के. जी .म्हात्रे मॅडम यांनी श्री रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच सर्व शिक्षकांनी पूजन केले .शाळेच्या उपशिक्षिका सौ डी.आर .वर्तक मॅडम यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेच्या उपशिक्षिका सौ डी. आर. वर्तक मॅडम यांनी स्वतः बनवलेल्या गणिताच्या साहित्याचे प्रदर्शन केले या प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम यांनी केले. प्रत्येक इयत्तेला बोलावून या साहित्याचे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या उपशिक्षिका सौ डी आर वर्तक मॅडम यांनी केले. सगळ्यात शेवटी सर्वांचे आभार मानून हा कार्यक्रम संपन्न झाला .हे अध्यक्षांच्या वतीने घोषित करण्यात आले.

## पीवीएस एक्सीलेंस अवॉर्ड–2025: बेस्ट पॉलिटिकल रिपोर्टर म्हणून दीपक कैतके यांचा गौरव

### २७ डिसेंबरला मुंबईत भव्य समारंभ; पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गजांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | प्रतिनिधी :** पत्रकारितेतील निष्पक्ष, निर्भीक आणि जनहितकारी कामगिरीसाठी दीपक कैतके यांची पीवीएस एक्सीलेंस अवॉर्ड–2025 अंतर्गत बेस्ट पॉलिटिकल रिपोर्टर म्हणून निवड करण्यात आली आहे. हा सन्मान पत्रकार विकास संघ (पीव्हीएस) यांच्या वतीने शनिवार, २७ डिसेंबर रोजी मालाड (प.) लिंक रोडवरील कांचपाडा येथील साई पॅलेस हॉटेल येथे आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.

पत्रकार विकास संघाने आपल्या सत्रह वर्षांच्या सातत्यपूर्ण, सृजनशील आणि मूल्यनिष्ठ वाटचालीनंतर अठराव्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही पीवीएस एक्सीलेंस अवॉर्ड–2025 चे आयोजन करण्यात आले असून, प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल, फोटोग्राफी, संपादन आणि रिपोर्टिंग अशा विविध माध्यमांतील



उत्कृष्ट योगदानाची दखल घेतली जाणार आहे.

**राजकीय पत्रकारितेत ठसा**

दैनिक महासागरचे वरिष्ठ पत्रकार दीपक कैतके यांनी राजकीय घडामोडींचे तथ्याधारित विश्लेषण, जनहिताचे मुद्दे प्रभावीपणे मांडणे आणि संतुलित रिपोर्टिंग या कार्यासाठी हा गौरव मिळवला आहे, असे पीव्हीएस ज्यूरीने स्पष्ट केले.

**इतर पुरस्कार विजेते**

पीव्हीएस ज्यूरी अवॉर्ड–2025 (श्रेष्ठ संपादक): संजय सावंत (आपला महानगर)

पीव्हीएस ज्यूरी रजत जयंती अवॉर्ड–2025: ओमप्रकाश तिवारी (दैनिक जागरण)

पीव्हीएस जीवनगौरव (पत्रकार)–2025: शेषनाथ सिंह (दोपहर का सामना)

पीव्हीएस जीवनगौरव (फोटोग्राफर)–2025: प्रदीप धीवर

बेस्ट रिपोर्टर (जनरल): भानु प्रकाश मिश्र (दैनिक भास्कर)

बेस्ट क्राईम रिपोर्टर: डॉ. अखिलेश तिवारी (नवभारत टाइम्स)

बेस्ट यंग जर्नलिस्ट: नम्रता अरविंद दुबे

बेस्ट डिजिटल जर्नलिस्ट: प्रवीण नालावडे

बेस्ट टीव्ही रिपोर्टर: कृष्णा सोनारवाडकर

बेस्ट फोटोग्राफर: शैलेश जाधव

बेस्ट व्हिडिओ जर्नलिस्ट: राजेंद्र दशरथ धयालकर

पीव्हीएस ज्यूरी अवॉर्ड (स्व. शिवा देवनाथ स्मृती) – अंशकालिक पत्रकारिता: अनिल शुक्ला

पीव्हीएस ज्यूरी अवॉर्ड (संपादकीय): विक्रम जादव

**पीव्हीएस पत्रकार मित्र सन्मान–2025**

पत्रकारांना सहकार्य व सामाजिक उपक्रमांतील योगदानासाठी डॉ. अजय गुप्ता, प्रेम प्रकाश दुबे, केशव अंचन, उदय प्रताप सिंह, सुनील काबरा आणि अभिषेक जाजू यांना पत्रकार मित्र सन्मानाने गौरविण्यात येणार आहे.

पीव्हीएस एक्सीलेंस अवॉर्ड्सच्या माध्यमातून सत्य, मूल्यनिष्ठा आणि जनहित या पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना अधोरेखित केले जाते. हा सन्मान केवळ पुरस्कार विजेत्यांच्या कार्याची दखल घेत नाही, तर नव्या पिढीतील पत्रकारांनाही जबाबदार, निर्भीक आणि समाजाभिमुख पत्रकारितेसाठी प्रेरणा देतो.

## सोयगाव शहरात “भाजप व दिशा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने ‘नेत्रसेवा आपल्या दारी’ उपक्रम”

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्यास प्राधान्य देणारा उपक्रम म्हणून भारतीय जनता पार्टी सोयगाव व दिशा फाउंडेशन सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने,लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर चिकलठाणा यांच्या सहकार्याने आणि लायन्स नेत्र रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून “नेत्रसेवा आपल्या दारी” या उपक्रमांतर्गत मोफत भव्य नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.हे शिबीर श्री हनुमान मंदिर, जुना बाजार चौक, सोयगाव येथे पार पडणार असून, अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज फिरत्या नेत्रसेवेच्या माध्यमातून नागरिकांची सखोल नेत्र तपासणी करण्यात येणार आहे.या शिबिरात दगाळ व अंधुक दिसणे,रात्री दृष्टी कमजोर होणे,रंग फिके दिसणे,चकाकी जाणवणे, चष्म्याच्या नंबरमध्ये वारंवार बदल,मळमळ, उलटी, डोळेदुखी,परिधीय दृष्टी कमी होणे आदी तक्रारींची तपासणी केली जाणार आहे.तसेच मधुमेहामुळे होणारे नेत्रविकार, केंद्रीय दृष्टी कमी होणे,काळे ठिपके दिसणे,लाल डोळे, वाचण्यात अडचण,जवळून पाहताना त्रास,कांचबिंदू (मोतिबिंदू), ष्टीदोष, तिरळेपणा यांची तपासणी करण्यात येणार आहे.यासोबतच मधुमेह व रक्तदाब तपासणी देखील करण्यात येणार असून,गरजू रुग्णांसाठी मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच दर्जेदार चष्मे नाममात्र दरात मिळणार आहेत.या आरोग्याभिमुख उपक्रमाचा लाभ नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा,असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी कैलास काळे, सुनील गावंडे,मंगेश सोहनी, वसंत बनकर,राजेंद्र जावळे, मयूर मनगटे,प्रमोद पाटील, अनिल चौधरी व सुनील ठोंबरे यांच्याशी संपर्क साधावा.

## मौजे.भोकरखेड ता.रिसोड येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबीर संपन्न



**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, संलग्नीत सुविदे फाउंडेशन, रिसोड द्वारा संचालित ग्राम. भोकरखेड ता. रिसोड जिल्हा वाशिम येथे दि. 21/12/2025 रोजी सायं. 7 वाजता युवा प्रेरणादायी व्याख्याते समाजप्रबोधनकार गोपाल गजानन भिसडे यांच्या नेतृत्वात स्वच्छ भारत अभियान हुंडा बंदी व पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकासावर विशेष लक्ष केंद्रित करून शास्वत विकासासाठी युवकांचे योगदान, ग्रामस्वछता, जलसंधारण पर्यावरण संरक्षण, स्त्री शिक्षण, या सामाजिक बाबीवर प्रबोधन करण्यात आले,संबंधित कार्यक्रम साठी ग्राम.भोकरखेड येथील प्रथम नागरिक श्रीमती राधिका लक्ष्मणजी हागे (सरपंच) तथा 46 महिला व 52 पुरुष असे मिळून एकंदरीत 100 च्या जवळपास जनतेनी लाभ घेतला,कृषी महाविद्यालय रिसोड येथील प्राचार्य डॉ.आशिष अपतूरकर,विशेष तांत्रिक समन्वयक राजेश डवरे प्राध्यापक लक्ष्मण काळे, प्राध्यापिका सिया टारपे, सौ.सीमा बाळे श्री नंदकुमार थोरात, सुधाकर बोदडे,नंदकुमार थोरात यांचे विशेष सहकार्य व उपस्थिती लाभली.संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी या नात्याने प्राध्यापक दिपक मसुरकर यांनी केले होते.

# श्री मतोबा महाराज यात्रोत्सवास ३ जानेवारी पासुन उत्सहात प्रारंभ होणार

## देवस्थान ट्रस्ट पहाटे ५ वाजता "महापुजा" तर सकाळी ८-३० वाजता "रथपुजा" करण्याचे नियोजन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी :** लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व नैताळे ग्रामस्थांचे अराद्य दैवत श्री मतोबा महाराज यात्रोत्सवास दिनांक ३ जानेवारी रोजी उत्सहात प्रारंभ होत आहे.हा उत्सव दिंनांक १८ जानेवारी पर्यंत अखंड सुरु रहाणार आहे यांत्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी देवस्थान ट्रस्टच्या वतीने "महापुजा" व "रथ पुजा"अशा धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती श्री मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव बोरगुडे व विश्वस्त मंडळाने दिली आहे.

नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या नैताळे येथे दरवर्षी पौष पोर्णिमेला श्री मतोबा महाराज



यांचा यात्रोत्सव भरविला जातो हा उत्सव अखंड १५ दिवस सुरु राहतो या वर्षी ३ जानेवारी रोजी पौष पोर्णिमा असल्याने यात्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी पहाटे ५ वाजता भागवताचार्य ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली शिंदे (साधना आश्रम रुई) व कृषीराज अँग्रो सर्विसचे संचालक प्रकाश पगार व छाया पगार यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांच्या नविन चांदीच्या मुर्तीची "महापुजा"केली जाणार आहे तर सकाळी ८-३० वाजता बोकडदरे येथील भारत माता आश्रमाचे महंत श्री महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते "रथपुजा" केली जाणार आहे.यावर्षी रथ मिरवनुकीस प्रारंभ करताना रथाला पहिली बैलजोडी जुंपण्याचा मान सिन्नर तालुक्यातील पाटवाडी येथील शेतकरी नंदकिशोर महात्मे यांना देण्यात आला आहे.सध्या देवस्थान परिसरात विविध ठिकाणी बांधकाम सुरु असुन ते लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी देवस्थान ट्रस्ट प्रयत्नशिल आहे.यात्रोत्सवाची तयारी म्हणून दर्शन रांगेची बांबु-बल्यानी बांधनी केली जाणार आहे तसेच भाविकांचे उन्हापासुन संरक्षणासाठी मंडप उभारला जाणार आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषनाई केली करण्यात येणार आहे.मंदिर व परिसरात गर्दीच्या नियंत्रणासाठी स्वयमसेवकाच्या नेमनुका केल्या जाणार आहे त्यासाठी स्वयमसेवकाना टी-शर्ट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.भाविकांना पिण्यासाठी शुध्द पाण्याची व्यवस्था केली जाणार आहे.नारळ फोडण्यासाठी मशिनची व्यवस्था करण्यात आली आहे.यात्रा कालावधीत दररोज सकाळी ६ वाजता ,दुपारी १२ वाजता व संध्याकाळी ७ वाजता संगितबध्द आरतीचे नियोजन करण्यात आले आहे.

## रिअल इस्टेट सल्लागारांची बाजू ऐकली गेली, चंद्रशेखर बावनकुले यांनी प्रक्रिया पुढे नेण्याचे आश्वासन दिले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** भारतीय रिअल इस्टेट सल्लागार एजंट / वेल्फेअर युनियनच्या प्रतिनिधिमंडळाने दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी मा.श्री.चंद्रशेखर बावनकुले यांची भेट घेऊन रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे निवेदन सादर केले. अत्यंत व्यस्त वेळापत्रक असूनही बावनकुले यांनी प्रतिनिधिमंडळाला वेळ दिला, त्यांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले आणि सादर केलेले निवेदन पुढील कार्यवाहीसाठी पुढे नेण्याचे आश्वासन दिले.या प्रतिनिधिमंडळाचे नेतृत्व युनियनचे संस्थापक व अध्यक्ष श्री राजवीर सिंह यांनी केले. त्यांच्या समवेत युनियनचे सचिव मोहन बडवाईक, कार्यकारी अध्यक्ष संजय कृपान, उपाध्यक्ष प्रदीप मनवार, उपाध्यक्ष संजय खोब्रागडे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.प्रतिनिधिमंडळाने रिअल इस्टेट क्षेत्रातील जमीनी वास्तव,



सल्लागारांची भूमिका तसेच या विशाल क्षेत्राच्या सुव्यवस्थित व संतुलित विकासाशी संबंधित मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली. हे निवेदन रिअल इस्टेट सल्लागारांची भूमिका अधिक संघटित, सन्मानित व प्रभावी करण्याच्या उद्देशाने करण्यात आले.

यावेळी संस्थापक व अध्यक्ष राजवीर सिंह यांनी सांगितले की, रिअल इस्टेट सल्लागार हे सर्वसामान्य नागरिक व गृहव्यवस्था यांच्यातील महत्त्वाचा दुवा असून, त्यांच्या अनुभवांना धोरणात्मक पातळीवर महत्त्व दिले जाणे आवश्यक आहे.

कार्यकारी अध्यक्ष संजय कृपान यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, रिअल इस्टेटसारख्या मोठ्या क्षेत्रात कार्यरत सल्लागारांसाठी स्पष्ट दिशा, समन्वय व संघटित मंच अत्यंत गरजेचा आहे. युनियनचा उद्देश केवळ सध्याच्या अडचणींपुरता मर्यादित नसून, आगामी काळात या क्षेत्रासाठी एक मजबूत व स्थिर भविष्य घडवणे हा आहे. चंद्रशेखर बावनकुले यांनी प्रतिनिधिमंडळाने मांडलेले सर्व मुद्दे लक्षपूर्वक समजून घेतले व सांगितले की, इतक्या मोठ्या क्षेत्राशी संबंधित निवेदन गांभीर्याने विचारात घेतले जाईल. त्यांनी आश्वासन दिले की सादर केलेले विषय संबंधित स्तरावर पुढील आवश्यक प्रक्रियेसाठी पाठवले जातील. युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी बावनकुले यांच्या सकारात्मक दृष्टिकोनाबद्दल, वेळ दिल्याबद्दल आणि सहकार्यपूर्ण भूमिकेबद्दल आभार मानले. या भेटीला युनियनसाठी आशादायी व पुढील कार्यवाहीस दिशा देणारा टप्पा मानण्यात आले.

## घंटा गाडी चालक किरण भानखेडे यांचा नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ राळेगाव :** येथील नगरपंचायतचे घंटागाडी चालक किरण भानखेडे यांचा प्रभाग क्रमांक ८ च्या नागरिकांकडून नगरसेवक माजी बांधकाम सभापती मंगेश राऊत यांच्या कल्पनेतून भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले प्रभाग क्रमांक आठच्या खुल्या प्रांगणात या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते सत्कारमूर्ती किरण भानखेडे हा प्रभाग क्रमांक आठ माता नगर येथे नियमित सकाळी सात वाजता पासून परिसरातील घनकचरा गोळा करण्याकरिता चालक म्हणून आपली सेवा अविरत देत आहे त्याच्या सेवेत कुठलाही खंड पडत नाही यादरम्यान



त्यांच्या अविरतसेवेतून नागरिकांची त्याने मने जिंकली आहेत त्याच्या या निष्काम सेवेबद्दल त्यांचा नागरी सत्कार घडून आणला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी सरपंच कृष्णरावजी राऊळकर होते तर माजी तहसीलदार मधुकरराव गेडाम बापू फाउंडेशनचे अध्यक्ष रमेशराव माकोडे माजी प्राचार्य अशोकराव पिंपरे ज्येष्ठ नागरिक दमडूजी वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती किरण भानखेडे यांच्या कार्याची दखल नगरसेवक मंगेश राऊत यांनी घेतल्याबद्दल त्यांचीही या ठिकाणी कौतुक करण्यात आले याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना किरण भानखेडे म्हणाला की आमच्यासारख्या सामान्य कर्मचाऱ्यांची आपण सर्वांनी दखल घेतल्याबद्दल मन भरून आले आहे सामान्य कर्मचाऱ्याचा जेव्हा नागरिकाकडून सत्कार होतो तेव्हा अधिक कार्य करण्याची उमेद प्राप्त होते यांप्रसंगी उपस्थित त्यांनी आपले मत व्यक्त केले या कार्यक्रमास प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळीश्री. गजानन घुंगरूड,सुरेंद्र ताटे,माणिक भोंगाडे, कवडूजी येपारी,वाल्मीक मेश्राम, भगवान धनरे, नंदू नालमवार, ढुमणे सर, अरविंदराव तामगाडगे, अशोक काचोळे,अजय वैद्य,सय्यद लियाकत, मनोज पेंदोर,प्रफुल खसाळे,दिनेश करमणकर, श्रीकांत कोदाणे,यांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्री नितीनकोमेरवार, प्रदीप महल्ले, संजय दुरबुडे, रुपेश कोठारे,योगेश इंगोले या सर्वांनी कार्यक्रमाची नियोजन केले.कार्यक्रमाचे संचालन मंगेश राऊत नगरसेवक माता नगर यांनी केले तसेच आभार प्रदर्शन श्रावणसिंग वडते यांनी मान्यवरांचे व नागरिकांचे आभार मानले.

## अस्मिता महिला महाविद्यालय एनएसएस व इंडियन मेडीकल असोशिएशन तर्फे मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** ओम विद्यालंकार शिक्षण संस्थेच्या अस्मिता कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, विक्रोळी (पूर्व),राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर रविवार, २१ डिसेंबर रोजी यशस्वीपणे संपन्न झाले.सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात परिसरातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेऊन मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. विशेषतः महिलांच्या आरोग्याशी संबंधित तपासण्या या शिबिरात प्राधान्याने करण्यात आल्या.

शिबिरात मुंबईतील डॉ. हरिश एम. पांचाळ, डॉ. प्रदीप आंग्रे, डॉ. भरत तलसानिया, डॉ. भावना खेतिया, डॉ. मेघा शेट्टी



आदी नामवंत डॉक्टरांनी सेवा दिली.

शिबिराचे स्थळ शिवसानिध्य, शासकीय आश्रम शाळेजवळ, भिनार, भिंवडी येथे होते. या शिबिराचे आयोजन डॉ. मनिषा प्रनिल नायर (अध्यक्षा, ओम विद्यालंकार शिक्षण संस्था) आणि डॉ. सी. ए. एम. ओझा (प्राचार्य, अस्मिता महिला महाविद्यालय) तसेच इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएसचे अध्यक्ष डॉ.हरिश पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

या शिबिरामुळे परिसरातील महिलांना आणि नागरिकांना आरोग्य सेवा सहज उपलब्ध झाल्या. आयोजकांनी अशा उपक्रमांमुळे सामाजिक जागृती वाढते आणि आरोग्य सुधारते, असे डॉ.मनिषा नायर व डॉ.हरिश पांचाळ यांनी सांगितले. महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने हा उपक्रम उत्कृष्टरीत्या पार पाडला.अशा सामाजिक उपक्रमांमुळे अस्मिता महाविद्यालयाची सामाजिक बांधिलकी अधोरेखित होते. भविष्यातही असे शिबिर आयोजित करण्यात येतील, असे आयोजकांनी जाहीर केले.

# शेतकरी राजा आता होणार चिंतामुक्त!

## सौर कृषी पंपाच्या तक्रारींसाठी महावितरणचा 'डिजिटल' हातभार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू संपादक / नागपूर विभाग :** शेतात दिवसा सिंचन करण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेने महाराष्ट्राच्या शेतीमध्ये क्रांती घडवून आणली आहे. आता या योजनेचा लाभ घेताना किंवा देखभाल करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी महावितरणने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. शेतकऱ्यांना आता कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज नसून, घरबसल्या एका क्लिकवर आपल्या तक्रारींचे निवारण करता येणार आहे.

**तक्रार निवारण पोर्टल: पारदर्शक आणि वेगवान:**

सौर कृषी पंप बसवताना विलंब होत असेल किंवा सुरू असलेल्या पंपात तांत्रिक बिघाड झाला असेल, तर आता थेट ऑनलाइन दाद मागता येईल. महावितरणने यासाठी विशेष 'तक्रार निवारण पोर्टल' सज्ज केला असून, तक्रारीचा मागोवा (Status Tracking) घेण्याची सोयही उपलब्ध करून दिली आहे.

**तक्रार नोंदवण्याची सोपी प्रक्रिया (स्टेप-बाय-स्टेप):**

शेतकरी बांधवांनो, आपली तक्रार नोंदवण्यासाठी सौर कृषी पंप धारकाने सर्वप्रथम महावितरणच्या www. mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर जा. त्यावरील होमपेजवर डाव्या बाजूला असलेल्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' या टॅबवर क्लिक करा. तेथील तक्रार निवारण टॅबवर जाऊन तिथे 'Register Complaint' (तक्रार नोंदवा) हा पर्याय दिसेल, त्यावर क्लिक करा. त्यानंतर तक्रार निवारण' विभागात जाऊन. तक्रार नोंदवताना आपला लाभार्थी क्रमांक किंवा मोबाईल क्रमांक किंवा जिल्हा, तालुका, गाव आणि लाबार्थीचे नाव टाकून शोधा व त्यानंतर आपली समस्या सविस्तर लिहा किंवा तक्रारीच्या स्थितीचा आढावा, देखील तुम्ही याच पोर्टलवर पाहू शकता

**नागपूर परिमंडलाची यशस्वी वाटचाल**

नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील हजारो शेतकरी आज सौर ऊर्जेवर यशस्वीपणे शेती फुलवत आहेत. मागेल त्याला सौर पंप योजना, मुख्यमंत्री सौर पंप योजना आणि अटल सौर पंप योजनांतर्गत नागपूर परिमंडळालात तब्बल 7 हजार 94 सौर पंप कार्यान्वित झाले आहेत. यात नागपूर जिल्ह्यातील 4 हजार 880 तर वर्धा जिल्ह्यातील 2 हजार 214 पंपाचा समावेश आहे. गेल्या वर्षभरात नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातून आलेल्या सर्व तांत्रिक तक्रारींचे महावितरणने यशस्वीपणे निवारण केले आहे. यामुळे शेतकऱ्यांचा या योजनेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

**तुम्ही अजूनही सौर पंप घेतला नाही का?**

'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही योजना केवळ वीज बिल वाचवत नाही, तर रात्रीच्या वेळी साप-विंचवाच्या भयातून मुक्तता देऊन दिवसा सुरक्षित सिंचनाची हमी देते. याशिवाय मोफत/ सवलतीच्या दरात सौर संच. दिवसा हक्काची वीज. कमी देखभाल खर्च आणि 10 ते 25 वर्षांची गॅरंटी. पर्यावरणपूरक शेती. यामुळे, ही योजना शेतक-यांसाठी वरदान ठरत असून राज्यातील दुस-या हरित क्रांतीकडे मार्गक्रमण करीत आहे.

शेतकरी बांधवांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता, तांत्रिक अडचणींसाठी या ऑनलाइन सुविधेचा लाभ घ्यावा आणि ज्यांनी अजून अर्ज केला नाही, त्यांनी त्वरित 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेचा लाभ घेऊन आपली शेती समृद्ध करावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## एम एस सी आय टी परीक्षेत हनीफ साईवाला तालुक्यातून प्रथम; जिल्ह्यातून दुसऱ्या येण्याच्या बहुमान मिळाल्याने मान्यवराकडून सत्कार

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी सय्यद ईसा :** माहूर शहरातील रहिवासी असलेले कादरभाई साईवाला यांचा मुलगा हनीफ साईवाला याने एम एस सी आय टी परीक्षेत जिल्ह्यातून दुसरा तर तालुक्यातून पहिला येण्याचा बहुमान मिळविल्याने मान्यवराकडून त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले

माहूर येथे शासनाच्या महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन या शिक्षण प्रकारात एम एस बी टी इ



अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत एम एस सी आय टी मध्ये दि 16 12 2025 रोजी विनायका कॅम्पुटर इन्स्टिट्यूट येथे पार पडलेल्या परीक्षेत एकूण 46 विद्यार्थ्यांनी विनायका कम्प्युटरचे संचालक आनिल जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा दिली तर जिल्ह्यात हजारो विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती या परीक्षेत हनीफ साईवाला यांनी ही परीक्षा दिली सुरुवातीपासूनच अभ्यासात अतिशय हुशार असल्याने आणि त्याने एम एस सी आय टी परीक्षेत 98 टक्के घेऊन जिल्ह्यातून दुसरा येण्याचा बहुमान मिळविला तर तालुक्यातून त्याने प्रथम क्रमांक पटकविला हनीफ साईवालाचे वडील हे मोल मजुरी सह हातगाडा चालवून उदरनिर्वाह करतात काटकसर करून त्यांनी मुलाच्या इच्छेप्रमाणे त्यास एम एस सी आय टी सी क्लासेस लावल्याने तसेच अनिल जाधव सरांचे मार्गदर्शन मिळाल्याने त्याने भरघोस यश संपादन केल्याचे त्याचे वडील कादर साईवाला यांनी सांगितले यावेळी एम आय एम चे तालुका अध्यक्ष सज्जाद शेख अजिज शेख प्रसिद्ध समाजसेवक इर्शाद भाई मकरानी अज्जू भाई, फैजुल्ला खान, शहजाद नवाब, अर्सलान शेख, मुस्तकिम शेख यांचे सहकार्यकर्ते उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# राळेगाव शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ

## बातमी प्रकाशित करताच अखेर खैरी जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या वर्ग ६ ते ८ वर्गाला मिळाले शिक्षक

## शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष खुशाल वानखेडे यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :** नुकत्याच शासकीय नियमानुसार जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांच्या बदल्या झाल्या.त्यात प्रत्येक वाट्याला काही ना काही शिक्षक देण्यात आले.परंतु राळेगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या खैरी या गावी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा खैरी येथे पदवीधर व उच्च श्रेणी शिक्षक श्री किसन सीडाम यांची वर्ग सहा ते आठ या वर्गासाठी १२/०९/२०२५ रोजी नियुक्ती करण्यात आली.परंतु ते सेवा जेष्ठ शिक्षक असल्यामुळे त्यांच्याकडे प्रभार मुख्याध्यापकाचा पदभार न देता त्यांना डिगडोह येथील एक ते चार वर्ग असलेल्या शाळेवर तेरा दिवसांनी कार्यमुक्त करण्यात आले होते.कारण की त्यांच्याच विषयाचे शिक्षक श्री राजेंद्र दुरबुडे हे यांची बदली न्यायालयीन प्रक्रियेत येत असल्यामुळे त्यांना खैरी शाळेवरून कार्यमुक्त करण्यात आले नव्हते.परंतु त्यांना दुसऱ्यावर डेपुटेशन



देता येत असतानाही सेवा जेष्ठ शिक्षक श्री सिडाम यांचे तेरा दिवसानंतर डेपुटेशन का काढण्यात आली सेवा ज्येष्ठतेनुसार त्यांना शाळेचा मुख्याध्यापकाचा पदभार नेता १३ दिवसानंतर कार्यमुक्त का करण्यात आले हा प्रश्न उभा ठाकतो ?तेव्हा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष खुशाल वानखेडे यांनी हा प्रश्न उपस्थित केला व गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे रीतसर अर्ज देऊन शैक्षणिक विभागात विभागाच्या बाबतीत माहितीचे तीन अधिकार सुद्धा टाकले,जिल्हा परिषद केंद्र शाळेत शिक्षक पालक व विद्यार्थी यात समन्वय साधता यावा यासाठी पालक सभा घेण्यात आली पालक सभेत प्रभारी मुख्याध्यापकांनी लोकांना शैक्षणिक बाबतीत व शिक्षणाबद्दल माहिती न देता व त्यावर विचाराव चर्चा करण्याऐवजी व विषयावरील अभ्यासक्रमाबाबत बद्दल माहिती देण्याऐवजी केवळ पालकांना डोक्याला अक्षद लावून व त्यांच्या खात्यावर दुपट्टा टाकून व स्त्रियांना ब्लाउज पीस देऊन सत्कार केला तसेच अध्यक्ष प्रश्न काही उपस्थित करतील की काय ? याची त्यांना भीती होती की काय? तर किंवा कोणत्या शैक्षणिक मुद्दे उपस्थित करतील.या सभेत अध्यक्षाच्या विरोधात काही जवळच्या लोकांना भडकावून अध्यक्षाच अपमान करण्याचा प्रयत्न सुद्धा करण्यात आला.असे पालक सभेनंतर काही लोकांकडून कळले परंतु सत्य किती असते हा विषय नाही.व पालक सभेचे विषय बाजूला ठेवून दुपट्टे व ब्लाउज पीसचे लोकांना वाटप सुरू केले व पालक सभेचा ज्या उद्देशाने आयोजित केली होती की पालकांचा जाणून बुजून सत्कार करून विद्यार्थ्यांचे प्रश्न बाजूला ठेवायचे होते की काय? वास्तविकता विद्यार्थ्यांच्या पालकाबद्दल समस्या असतील किंवा पालकाच्या विद्यार्थ्या किंवा पालकांच्या शिक्षकांचा विद्यार्थ्याबद्दल समस्या असतील हा विषय बाजूला राहून दुपट्टे व ब्लाउज पीस वाटप करून पालक सभेचा विषय आला,त्यातही वास्तविकता पालक सभेत पालक विद्यार्थी शिक्षक व व्यवस्थापन समिती ही महत्त्वाची असताना काही गावातील लोकांना सुद्धा निमंत्रित करण्यात आले हे विशेष! पालक सभेचा विषय बाजूला राहते व आणि विद्यार्थ्याबद्दल काही माहिती आपल्याला देता येत नाही म्हणून शाळा व्यवस्थापन समिती कारण की काही दोन-तीन व्यक्तींनी अध्यक्षांना तुम्ही शाळेतच वारंवार भेटीला का येता? असे प्रश्न केला तुम्ही नेहमी शाळेत यायचं काम नाही अशी सुद्धा बोलले.असे म्हटल्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आपला अपमान सहन करू शकले नाही व त्यांना शिक्षणाबद्दल इतर चर्चा व शाळेच्या विकास कामाबद्दल महत्वाचे चर्चा करावयाची असल्यामुळे हातावर दुपट्टा कार्यक्रम पाहू नका काही पालकाकडून थोडीफार मिळालेले वागणूक अपमानास्पद वाटल्यामुळे व विद्यार्थी विषयक काही ठराविक पालक शाळेच्या बाबतीत वाटून मुलांचे विकासाकडे जोर न दिसल्यामुळे अध्यक्षांनी चर्चा करावयाची होती पालकांना काही माहिती द्यायचे होते परंतु सभेतील काही मोजक्या दोन-चार माणसांना कडून अपमान झाल्यासारखे वाटल्याने व्यवस्थापन समिती अध्यक्ष सभेमधून निघून गेले हे विशेष !तसा त्याबाबतीत माननीय गटशिक्षणाधिकारी साहेब त्याच्याकडे सदर अध्यक्ष यांनी गटशिक्षणाकडे यांच्याकडे शाळेतील काही तक्रारीबाबत माहितीचा अधिकार त्यासोबतच इतर दोन सुद्धा माहिती अधिकार सुद्धा टाकला आहे.तसेच शाळेच्य संदर्भात एक अर्ज केला आहे ह्या अपमानासंस्पद वागणुकीचे वाईट न वाटून घेता शालेय अध्यक्षांनी माघार न घेता शालेय विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता आपला लढा सुरू केला वरिष्ठ स्तरावर उठाव घेऊन लढा देण्याचा प्रयत्न केला प्रयत्न केला परंतु राळेगाव चे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी व गटविकास अधिकारी यांनी तात्काळ शिक्षक खैरी शाळेला देऊन दिला व तुमचे प्रकरण इथे तात्काळ निर्वाळा करतो. व दुसऱ्याच दिवशी श्री किसन सिडम सर यांना तात्काळ खैरी जिल्हा परिषद केंद्र शाळा येथे रुजू करतो असे आश्वासन दिले व ते आश्वासन त्यांनी पूर्ण केले याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष खुशाल वानखेडे यांनी गटविकास अधिकारी केशव पवार व गटशिक्षणाधिकारी नवनाथ लहाने यांचे आभार मानले.

---

## मानोरा येथे भागवत पुराण व्यासपीट वर रजनीकांत बोरेले,आमदार सई डहाके यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ मानोरा :** वाशिम जिल्ह्यातील मौजा मानोरा येथील राठी नगर मध्ये श्रीमद भागवत महापुराण कथेचा आयोजन करण्यात आले होते. वृंदावन जिला मथुरा(उत्तर प्रदेश) येथील प्रसिध्द कथा वाचक श्री अरविंदजी महाराज यांच्या मधुर वाणीतुन करण्यात आली. दि.२०/१२/२०२५ ला रजनीकांत डालूरामजी बोरेले,सौ. नीता मड़ावी (बोरेले)पुत्र सर्वम बोरेले हे कथेला गेले होते यावेळी कथा वाचक अरविंदजी महाराज



यांनी रजनीकांत बोरेले हे खुप मोठे समाज सेवक आहे त्यांचे कार्य समाजाला प्रेरणा देणारी आहे आणि ते आमचे आधार स्तंभ असून दानशुर व्यक्ती आहे.माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेब यांच्या सोबतच रजनीकांत बोरेले यांना जिंदल पुरस्काराने विश्व प्रख्यात श्री रवि शंकरजी यांच्या हस्ते एकाच मंचावर गौरविण्यात आले होते असा व्यक्ती कथेला आलेत त्यांना व्यासपीट वर आमंत्रीत करुण रजनीकांत बोरेले यांना राधे राधे उल्लेखीत विशेष शेला अर्पण करुण सत्कार केला सोबत नीता बोरेले,सर्वम बोरेले यांचा सुद्धा सत्कार केला आहे. या नंतर मानोरा - कारंजा (लाड़) मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार श्रीमती सई प्रकाशजी डहाके यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. श्रीमद भागवत कथेचा आयोजन शारदा महिला मंडल मानोरा यांच्या वतीने करण्यात आला होता.यावेळी रजनीकांत बोरेले यांनी शारदा महिला मंडलच्या सर्व भगिनी आणि मुकेशजी शर्मा हे सर्व मंडळी खूपच भावुक,शिष्टाचारी आणि सात्विक आहे या सर्वांनी आमची उत्कृष्ट व्यवस्था केली सन्मान केला त्याबद्दल या सर्वांचे आभारी असल्याचे व्यक्त केले,पुढे म्हणाले आमदार साहेब आमची वहिनी असून त्यांचा सभाव अतिशय प्रेमळ आहे त्या आमदार असल्याने आमच्या मधात प्रकाश दादा डहाके असल्याचा जाणवत असल्याचे आमदार सई वहिनी डहाके यांच्याशी चर्चा करतांना म्हटले आहे.

---

## विक्रोळी कन्नमवार नगरात ब्रम्हाकुमारी शांतीवनचा ३१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगरात ब्रम्हाकुमारी शांतीवनचा ३१ वा वर्धापनदिन तर सेंटरला ३५ वर्ष पूर्ण होऊन ३६ वर्षात पदार्पण केल्याबद्दल वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विक्रोळी,घाटकोपर तसेच अंबरनाथ येथील ब्रम्हाकुमारी दिदी, ब्रम्हकुमार,आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती.या कार्यक्रमात शकुदिदी यांनी




ध्यानधारणेबाबत मार्गदर्शन करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात शांतीवनच्या सर्वसर्वा निलिमा दिदी यांचा सत्कार करण्यात आला.आणि शांतीवनच्या वाढदिवसाचा केक कापण्यात आला. कार्यक्रमात माजी महापौर दत्ता दळवी,माजी नगरसेवक उपेंद्र सावंत,ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर, दिनेश बेरीशेट्टी,सुरेश सरनोबत,आदी मान्यवर उपस्थित होते.२१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिनाचे महत्त्व सांगताना जगात सुख,शांतीचा संदेश पोहोचविण्यासाठी ध्यानधारणा आवश्यक आहे.असे आवाहन प्रमुख पाहुण्या शकूदिदी यांनी केले. विष्णूबेन यांनी उपस्थितांना ध्यानधारणेबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयश्रीदिदी खिलारी, अमितादिदी,प्रा. गोविंद हळदणकर यांच्यासह शांतीवनच्या ब्रम्हकुमारी व ब्रम्हकुमार यांनी बरीच मेहनत घेतली होती.

---

## विहिरीत पडून १३ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** नैताळे (ता. निफाड) येथील १३ वर्षीय मुलाचा विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.याबाबत समाधान विठ्ठल बोरगुडे (वय ३५, व्यवसाय – शेती, रा. नैताळे, ता. निफाड) यांनी पोलिसांना खबर दिली आहे. दि. २१ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मुखेड (ता. येवला) येथील ओम दिनानाथ गुरुकुलजवळील विहिरीत सार्थक संजय बोरगुडे (वय १३) हा मुलगा तोल जाऊन पडला. विहिरीतील पाण्यात पडल्याने त्याच्या नाकातोंडात पाणी जाऊन



बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला. घटनेची नोंद येवला ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक ७९/२०२५ नुसार भारतीय नागरिक व सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार आर. एन. पाटील करीत आहेत.

---

## उद्योगांच्या तत्पर वीजसेवेला महावितरणच्याऑनलाइन ‘स्वागत सेल’ पोर्टलने नवी ऊर्जा

- तक्रार निवारणाचा वेगही सुसाट; दर्जेदार सेवेचे दमदार पाऊल
- २७८ औद्योगिक संघटना थेट संवादासाठी २४x७ ‘कनेक्टेड’

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे /विदर्भ प्रमुख :** राज्यातील ४ लाख ४८ हजार उच्चदाब व लघुदाब औद्योगिक वीजग्राहकांना महावितरणकडून जागतिक दर्जाची तत्पर वीजसेवा देण्याची प्रक्रिया ऑनलाइन ‘स्वागत सेल’ पोर्टलमुळे अतिशय पारदर्शक व वेगवान झाली आहे. उद्योगांना वाढीव वीजभाराच्या मागणीनुसार सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होण्यासोबतच विविध प्रश्न व तक्रारी सोडविण्याचा वेगही वाढला आहे. यासह महावितरणसोबतच २४x७ थेट संवाद साधण्यासाठी या पोर्टलद्वारे राज्यातील २७८ औद्योगिक संघटना ‘कनेक्टेड’ झाल्या आहेत.

दरम्यान ऑनलाइन पोर्टलसह औद्योगिक संघटना व वीज ग्राहकांसोबत स्थानिक अधिकाऱ्यांच्या बैठकांसह महावितरणच्या थेट मुख्यालयातून संचालक व कार्यकारी संचालक स्तरावर व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्वतंत्र बैठका घेण्यात येत आहेत. विशेष म्हणजे वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, बिलिंग व इतर मुद्द्यांबाबत औद्योगिक संघटना व ग्राहकांनी मांडलेल्या प्रश्नांच्या निराकरणासाठी महावितरणने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) माहितीसाठी या पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. आतापर्यंत १२४ कार्यपूर्ती अहवाल अपलोड करण्यात आले आहेत. पोर्टलद्वारे व बैठकांमध्ये प्राप्त झालेल्या विविध २४२ पैकी २१५ तक्रारींचे ताबडतोब निराकरण करण्यात आले तर ऊर्वरित २७ प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन वीजयंत्रणा उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.

महावितरणकडून औद्योगिक वर्गवारीत लघु व उच्चदाबाच्या दरवर्षी सुमारे २३ हजारांवर नवीन वीजजोडण्या देण्यात येतात. सद्यस्थितीत औद्योगिक ग्राहकांचा एकूण वीजवापरात ४३ टक्के तर महसुलात ४१ टक्के वाटा आहे. राज्यातील औद्योगिक ग्राहकांना थेट संवादासाठी, विविध प्रश्न मांडण्यासाठी तसेच प्रश्नांचे पारदर्शक पद्धतीने व तत्पर निराकरण करण्यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती करण्याची सूचना मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने औद्योगिक ग्राहक व संघटनांसाठी www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्र ‘स्वागत सेल’ पोर्टल कार्यान्वित केले आहे.

महावितरणच्या ‘स्वागत सेल’ पोर्टलवर लॉगिनद्वारे लघु व उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना वीजभार वाढीसह विविध ग्राहकसेवांसाठी मागणी अर्ज तसेच वीजपुरवठा व बिलिंगबाबतच्या तक्रारी करणे सोयीचे झाले आहे. ऑनलाइन अर्ज किंवा तक्रारींबाबत ताबडतोब कार्यवाही करण्यात येत आहे. यासह वीजसेवेसंबंधी सूचना, प्रश्न किंवा विविध मुद्द्यांवर थेट संवाद साधण्यासाठी औद्योगिक संघटनांना स्वतंत्र लॉगिनद्वारे ‘स्वागत सेल’ पोर्टलवर विशेष स्थान देण्यात आले आहे. राज्यातील २७८ औद्योगिक संघटनांनी लॉगिनद्वारे नोंदणी केली आहे. यात पुणे प्रादेशिक विभागातील ८७, कोकण- ८३, नागपूर- ८० आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील २८ औद्योगिक संघटनांचा समावेश आहे.

राज्यभरातील लघु व उच्चदाब औद्योगिक वीजग्राहकांसह विविध औद्योगिक संघटनांकडून महावितरणच्या ऑनलाइन ‘स्वागत सेल’ पोर्टलचे स्वागत होत आहे. नियमित संवादासह वीजसेवेचे विविध प्रश्न व मागण्या ताबडतोब मार्गी लागत असल्याने औद्योगिक ग्राहकांच्या वीजसेवेला महावितरणच्या ऑनलाइन पोर्टलमुळे नवी ऊर्जा मिळाली आहे.

---

## सिल्लोडचा महासंग्राम : विजयाचा घास ओठाशी आला, पण 'त्या' दोन मतांनी इतिहास बदलला!

### सुनील मिरकरांचा अवघ्या २ मतांनी निसटता पराभव; मात्र जनसेवेचा 'वसा' कायम ठेवण्याचा निर्धार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** एखाद्या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाच्या क्लायमॅक्सलाही लाजवेल, असा थरार सिल्लोड नगरपरिषद निवडणुकीच्या मतमोजणीत पाहायला मिळाला. राजकारणात प्रत्येक मताला किती किंमत असते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. सिल्लोडच्या रणांगणात झालेल्या अटीतटीच्या लढतीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुनील मिरकर यांचा अवघ्या दोन मतांनी निसटता पराभव झाला. नियतीने जरी विजयाला हुलकावणी दिली असली, तरी मिरकर यांनी दाखवलेल्या संयमी आणि लढवय्या बाण्यामुळे "हारूनही जिंकलेला सिकंदर" अशीच चर्चा सध्या शहरभर सुरू आहे.



**अटीतटीची 'काटे की टक्कर'**

मतमोजणीच्या शेवटच्या फेरीपर्यंत कोणाचे पारडे जड राहणार, याचा अंदाज कुणालाच लागत नव्हता. दोन्ही बाजूने ईर्ष्येची लढत सुरू असतानाच, निकालाने उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकवला. केवळ दोन मतांच्या फरकाने सुनील मिरकर यांचा विजय हातातून निसटला. हा निकाल धक्कादायक होता, पण त्याहीपेक्षा धक्कादायक आणि कौतुकास्पद होती ती मिरकरांनी या निकालावर दिलेली प्रतिक्रिया!

**"हे दोन मते माझे भविष्य ठरवू शकत नाहीत"**

पराभवानंतर खचून न जाता सुनील मिरकर यांनी एका सच्चा लोकनेत्याप्रमाणे भूमिका मांडली. ते म्हणाले, "ही लढाई केवळ एका निवडणुकीची होती, जनसेवेची नाही. दोन मतांनी निकाल माझ्या विरोधात गेला असला तरी, जनतेशी असलेली माझी नाळ तुटलेली नाही. पद असो वा नसो, जनतेच्या सुखात आणि दुःखात मी कालही होतो, आजही आहे आणि उद्याही तितक्याच ताकदीने उभा राहीन. हा पराभव नसून ही मला जनसेवेसाठी मिळालेली नवी ऊर्जा आहे."

निकालानंतर कार्यकर्त्यांचे मनोबल खचू नये म्हणून मिरकर यांनी स्वतः पुढाकार घेत सर्वांचे आभार मानले. रात्रंदिवस मेहनत घेणारे कार्यकर्ते, विश्वासू सहकारी आणि आशीर्वादरूपी मतदान करणाऱ्या मतदारांचे त्यांनी ऋण व्यक्त केले. त्यांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा नवचैतन्य निर्माण झाले आहे.

**जनतेच्या मनातील 'विजेता'**

लोकशाहीत आकड्यांच्या खेळाला महत्त्व असते, त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सुनील मिरकर पराभूत झाले असतील. पण, एवढ्या निसटत्या पराभवानंतरही चेहऱ्यावर हास्य ठेवून पुन्हा समाजकारणात सक्रीय होण्याच्या त्यांच्या जिद्दीमुळे, जनतेच्या मनात मात्र तेच खरे 'विजेता' ठरले आहेत.

---

## सेलूत मिलिंद पवार ठरले धुरंधर; माजी नगराध्यक्षांचा पराभव

**सेलू प्रतिनिधी**

**शिवाजी पवार :** सेलू नगर परिषद निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार मिलिंद पवार यांनी दमदार कामगिरी करत माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांचा पराभव केला. या निकालामुळे सेलूच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, माजी नगराध्यक्षांचा पराभव हीच शहरात चर्चेचा विषय ठरली आहे.शांत स्वभावाचे आणि संयन्मी व्यक्तिमत्त्व अशी ओळख असलेले मिलिंद पवार यांनी प्रभाग क्रमांक ८ मधून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली. पहिल्याच नगरसेवक पदाच्या निवडणुकीत त्यांनी अनुभवसंपन्न व पंचवीस वर्षांहून अधिक काळ राजकारणात सक्रिय असलेल्या माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांना पराभूत करत आपली राजकीय ताकद सिद्ध केली.सेलू नगर परिषद निवडणुकीत





भाजपाला सत्तेचा मार्ग मोकळा झाला असला, तरी माजी नगराध्यक्षांचा पराभव हा निकालातील सर्वाधिक लक्षवेधी मुद्दा ठरला आहे. या पराभवामुळे भविष्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या विजयामुळे मिलिंद पवार यांचे शहरातील राजकीय वजन वाढले असून, येणाऱ्या काळात ते नगरपरिषदेच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे.

## वाशिमचे प्रताप नागरे यांची आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगात जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय मानवाधिकार सामाजिक न्याय आयोगात (International Human Rights Social Justice Commission) वाशिम जिल्ह्यासाठी जिल्हा प्रभारी (District Incharge) म्हणून प्रताप एन. नागरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, सदर नियुक्ती १ डिसेंबर २०२५ पासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैध राहणार आहे.

मानवाधिकार संरक्षण, सामाजिक न्याय, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण तसेच अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या या आयोगाच्या पत्रकारिता विभागात (Journalism Cell) नागरे यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचार, बालहक्कांचे उल्लंघन, मानव तस्करी, भ्रष्टाचार, शोषण, अन्याय व मूलभूत हक्कांचे उल्लंघन यासारख्या प्रकरणांमध्ये प्रशासनाशी समन्वय साधत कार्य करणे, तसेच घडामोडींबाबत शासन व संबंधित यंत्रणांना माहिती देणे ही जबाबदारी त्यांच्यावर असेल.

नियुक्तीपत्रात संविधान व आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करून समाजहितासाठी निष्ठेने कार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कोणत्याही बेकायदेशीर, समाजविघातक किंवा राष्ट्रविरोधी कृत्यात सहभाग आढळल्यास तत्काळ कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या नियुक्तीबद्दल वाशिम जिल्ह्यातून नागरे यांचे अभिनंदन होत असून, मानवाधिकार व सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात त्यांच्याकडून प्रभावी कार्य अपेक्षित आहे.

## श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) – भाजप युतीच्या विजयी उमेदवारांची जल्लोषात मिरवणूक

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : श्रीवर्धन नगर पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजप युतीच्या उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केल्यानंतर आज शहरात जल्लोषात भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीला नागरिकांचा मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या विजयी मिरवणुकीस कॅबिनेट मंत्री आदिती ताई तटकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच खासदार सुनिलजी तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व भाजपचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी करत आणि पक्षाचे झेंडे फडकावत कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. या वेळी बोलताना आदिती ताई तटकरे यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन करत, श्रीवर्धनच्या सर्वांगीण विकासासाठी युती एकसंघपणे काम करेल, असा विश्वास व्यक्त केला. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी विकासकामांना गती देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

खासदार सुनिलजी तटकरे यांनीही कार्यकर्ते व मतदारांचे आभार मानले. काल जाहीर झालेल्या निवडणूक निकालावर भाष्य करताना त्यांनी, "जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य आहे," असे स्पष्ट करत विरोधकांवर खोचक टोला लगावला. "बारस कोणाचं आणि घुगऱ्या कोण वाटत होत," अशा शब्दांत त्यांनी भरत गोगावले यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. येत्या काळात श्रीवर्धनचा आणखी विकास करण्याचा निर्धार व्यक्त करत, "विरोधकांनीही सोबत राहून विकासकामांसाठी सहकार्य करावे, जेणेकरून अधिक प्रभावीपणे शहराचा विकास करता येईल," असे आवाहन त्यांनी केले.

विजयी उमेदवारांनीही मतदारांचे आभार मानत, पारदर्शक, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख कारभार करण्याचा निर्धार व्यक्त केला. या विजयी मिरवणुकीमुळे संपूर्ण श्रीवर्धन शहरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## लोकस्वातंत्र पत्रकार महासंघात प्रताप नागरे यांची जिल्हा संघटन संपर्क प्रमुखपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे :** पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या सक्रिय, निर्भीड आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या प्रताप नारायण नागरे यांची लोकस्वातंत्र पत्रकार महासंघ या सामाजिकभिमुख राष्ट्रीय संघटनेच्या वाशिम जिल्हा संघटन संपर्क प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आली असून, संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांनी अधिकृत नियुक्तीपत्र देत ही घोषणा केली आहे.

लोकस्वातंत्र पत्रकार महासंघ ही केंद्र शासनाच्या नीति आयोग संलग्न, समाजाभिमुख राष्ट्रीय संघटना असून पत्रकारांचे हक्क, संरक्षण, संघटनात्मक बळकटीकरण आणि सामाजिक परिवर्तनासाठी सक्रिय कार्यरत आहे. या संघटनेच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर संघटन विस्तार, सदस्यसंख्या वाढ, पत्रकारांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे तसेच सामाजिक, वैचारिक बांधिलकी जोपासण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी प्रताप नागरे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

नियुक्तीपत्रात संघटनेच्या ध्येयधोरणानुसार कार्य करताना पत्रकार महासंघ अधिक व्यापक, मजबूत व क्रियाशील करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पत्रकार बांधवांमध्ये संघटनात्मक एकोपा निर्माण करणे, नव्या सदस्यांना जोडणे, तसेच सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे ही या पदाची प्रमुख जबाबदारी असणार आहे.

प्रताप नागरे हे पत्रकारिता क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, विविध सामाजिक, प्रशासकीय व जनहिताच्या विषयांवर सातत्याने लेखन, बातमीदारी व आवाज उठविण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

त्यांच्या या नियुक्तीमुळे वाशिम जिल्ह्यातील पत्रकार संघटन कार्याला नवी दिशा व बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते व विविध स्तरांतून प्रताप नागरे यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## देगलूर तालुक्यात मूल्यवर्धन ३ .०' उपक्रमाला सुरूवात

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे**
---------------

देगलूर(दि.२३) राज्यभरातील विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षण मिळावे, यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून २०१६ ते २०२० या कालावधीत मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यात आला होता.आता पुन्हा एकदा शालेय शिक्षण विभागामार्फत सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी 'मूल्यवर्धन ३.०' उपक्रम सुरू करण्यात आला आहे.या मोहिमेसाठी देगलूर तालुक्यातील पहिली ते आठवी वर्गाला शिकविणार्या ७४४ प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांना चार टप्प्यांत प्रशिक्षण देण्यात आले त्यातील पहिला टप्पा १७ नोव्हेंबर पासून सुरू झाला व शेवटचा टप्पा दि १६,१७ आणि २० डिसेंबर दरम्यान जिल्हा परिषद हायस्कूल मुलांचे येथे पार पडत आहे.



समग्र शिक्षा अभियानांतर्गत कृतीयुक्त व मूल्याधारित शिक्षणासाठी 'मूल्यवर्धन' उपक्रमास केंद्रीय प्रकल्प मान्यता मंडळाची मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून(एससीईआरटी) यापूर्वी २०१६- २०२० या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी मूल्यवर्धन उपक्रम राबविण्यात आला होता.

गोवा राज्यानेही या उपक्रमाचा स्वीकार केला होता.

या पार्श्वभूमीवर आता नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असा 'मूल्यवर्धन ३.०' कार्यकम पहिली ते आठवीसाठी २०३० पर्यंत राबविला जात आहे.तालुकास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम पार पडत आहे.त्यात पहिल्या ते चौथ्या टप्प्यात शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित असलेल्या पहिली ते आठवीच्या सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये अंमलबजावणी केली जात आहे.त्यामुळे सदरील शाळेच्या एकूण ७४४ शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

सदरील प्रशिक्षण गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तर प्रशिक्षण प्रमुख तथा शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी, प्रशिक्षण डायटचे समन्वयक डी.एम नाईक,मुथा फाऊंडेशन तालुका प्रमुख अविनाश खरगे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण तज्ञ मार्गदर्शक म्हणून झेड ए सय्यद,व्यंकटेश भाकरे,आर. डी.शिंदे,एस.एस. स्वामी,प्रमोद रावनगावे,श्रीकांत गरूडकर,निठूरे आदिंनी प्रशिक्षण दिले.

## धारूर नगरपालिकेत अजितदादांच्या घड्याळाचा गजर नगराध्यक्षपदी श्री. बालासाहेब जाधव यांचा दणदणीत विजय

**दैनिक युवक आधार**
**केज(प्रतिनिधी) :** २०पैकी ११नगरसेवक विजयी; शहरात जल्लोषाचे वातावरणधारूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) समर्थित उमेदवार श्री. बालासाहेब जाधव यांनी दणदणीत विजय मिळवत राजकीय वर्तुळात आपली ताकद सिद्ध केली आहे. या विजयासोबतच नगरपालिकेतील ११ नगरसेवक देखील विजयी झाल्याने धारूर शहरात अजितदादांच्या घड्याळाचा गजर मोठ्या उत्साहात सुरू आहे. निवडणूक निकाल जाहीर होताच समर्थकांनी फटाके फोडून, गुलाल उधळून आणि जल्लोष करत आनंद व्यक्त केला. शहरातील प्रमुख चौकांमध्ये विजयी मिरवणुका काढण्यात आल्या.

अजितदादा आगे बढो" आणि "बालासाहेब जाधव विजयी असो" अशा घोषणा परिसरात घुमत होत्या.मतदारांचा विकासाला कौलया निवडणुकीत धारूर शहरातील मतदारांनी स्पष्टपणे विकास, स्थिर नेतृत्व आणि विश्वासार्हतेला कौल दिल्याचे दिसून आले. श्री. बालासाहेब जाधव यांनी प्रचारादरम्यान पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, शिक्षण, आरोग्य सुविधा आणि शहराच्या सर्वांगीण विकासावर भर दिला होता. त्यांच्या या विकासाभिमुख भूमिकेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला.विशेष म्हणजे, ही निवडणूक केवळ व्यक्तींची नव्हे तर विचारांची असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवत घड्याळ चिन्हाला स्पष्ट बहुमत दिले आहे.

२० पैकी ११ नगरसेवकांचा ऐतिहासिक विजयया निवडणुकीतील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे नगरपालिकेतील ११ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस समर्थित उमेदवारांचा विजय. हा विजय केवळ संख्यात्मक नसून राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. एकहाती सत्ता मिळाल्यामुळे आता धारूर नगरपालिकेत निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.विजयी नगरसेवकांनीही मतदारांचे आभार मानत, "हा विजय जनतेचा आहे. धारूरच्या विकासासाठी आम्ही सर्वजण एकसंघपणे काम करू," असा निर्धार व्यक्त केला.विजयानंतर बालासाहेब जाधव यांची प्रतिक्रियाविजयानंतर बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष श्री. बालासाहेब जाधव म्हणाले,"धारूरच्या जनतेने माझ्यावर आणि आमच्या संपूर्ण टीमवर जो विश्वास दाखवला आहे, त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. हा विजय माझा वैयक्तिक नसून धारूरच्या प्रत्येक नागरिकाचा आहे.शहराच्या विकासासाठी मी कोणतीही कसर ठेवणार नाही."तसेच त्यांनी अजित पवार यांचे मार्गदर्शन, कार्यकर्त्यांचे परिश्रम आणि मतदारांचे प्रेम यांचा विशेष उल्लेख केला.राजकीय वर्तुळात चर्चेचा विषयधारूरमधील हा निकाल आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचा संकेत मानला जात आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागात अजित पवार गटाची पकड मजबूत होत असल्याचे या निकालातून स्पष्ट होते. विरोधी पक्षांसाठी हा निकाल आत्मपरीक्षणाचा विषय ठरत आहे.शहरातील नागरिकांकडून अपेक्षानव्या नगरपालिकेकडून आता धारूर शहरातील नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत.

पिण्याच्या पाण्याची समस्या, सांडपाणी व्यवस्थापन, रस्त्यांची दुरुस्ती, आरोग्य सेवा आणि युवकांसाठी संधी निर्माण करणे, या मुद्द्यांवर लवकरच ठोस निर्णय होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षावश्री. बालासाहेब जाधव तसेच सर्व विजयी ११नगरसेवकांवर अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि व्यापारी क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत धारूरच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोसायटीच्या चेअरमनपदी विठ्ठल चव्हाण यांची निवड



**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा प्रतिनिधी : श्री.रमेश सुरशे**
**(छत्रपती संभाजीनगर) :** विविध कार्यकारी सहकारी सोसायटी कृष्णापुरवडी कोलठाणच्या चेअरमनपदी विठ्ठल पाटील चव्हाण यांची तर व्हाईस चेअरमन पदी दलसिंग आसाराम गुसिंगे यांची आज ता.22 रोजी निवड झाली.यांवेळी जिल्हा परिषद सदस्य संतोष शेजुळ, माजी चेअरमन पुनम सिंग बहुरे, विष्णू पाटील दौड, सरपंच विजयसिंह गुसिंगे, चरणसिंग बहुरे, चरण कवंदे आदी सहित गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वांनी नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन दोघांचेही अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या..!!

## जि.प.प्रशाला सोयगावच्या शाळा व्यवस्थापन समितीची अध्यक्षपदी सुनील ठोंबरे, तर उपाध्यक्षपदी भारतीबाई गायकवाड यांची निवड"

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** जिल्हा परिषद प्रशाला, सोयगाव येथे सोमवार दि.२५ डिसेंबर २०२५ रोजी पालक सभेचे आयोजन करण्यात आले.या पालक सभेत दशसूत्री उपक्रमांतर्गत शाळा स्तरावरील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.तसेच शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.या पालक सभेतून शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात येऊन समितीची एकमताने निवड करण्यात आली.त्यामध्ये अध्यक्षपदी सुनील ठोंबरे,उपाध्यक्षपदी भारती भागवत गायकवाड यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून ललित पंडित, रुपाली समाधान पाटील, उज्वला शांताराम ढगे, वाल्मिक चव्हाण,भिला राठोड, अनिल शिंदे,अनिता पोपट कोळी यांची निवड



करण्यात आली.शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून अरुण सोहनी,स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी म्हणून कृष्णा जुनघरे,शिक्षक प्रतिनिधी म्हणून भास्कर चौधरी,स्थानिक प्राधिकरण प्रतिनिधी म्हणून नगरपंचायत सोयगावचे नगरसेवक,विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून भावेश अंबादास जाधव व चंचल नंदू राठोड यांची निवड करण्यात आली.


सचिवपदी मुख्याध्यापक दादाराव राठोड यांची नियुक्ती करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास अध्यक्ष सुनील ठोंबरे व सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.यावेळी शिक्षणप्रेमी अरुण सोहनी यांनी पालक–शिक्षक–शाळा यांचा परस्पर समन्वय कसा असावा याबाबत मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास माजी अध्यक्ष रामेश्वर शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक दादाराव राठोड,सुखदेव पाटील,शिवाजी नवले,संतोष भारद्वाज,विद्याधर बागुल,संगीता सोनवणे,तुकाराम पायघन,जया वाघ,वैजनाथ सावळे,शिवराम आगे व सचिन ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेंद्र उंबरकर यांनी केले.

## 'माझी शेती माझा सातबारा' योजनेतून ई-पीक पाहणी

### निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांना २४ जानेवारीपर्यंत नोंदणीचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभाग यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'माझी शेती माझा सातबारा मीच लिहीणार माझा पिकपेरा' या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे शेतकरी खातेदारांना आता तलाठी कार्यालयात न जाता स्वतःच्या मोबाईलवरून थेट आपल्या शेतातील पिकांची नोंद सातबारावर करता येणार आहे.या योजनेअंतर्गत डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) प्रणाली वापरात आणण्यात आली असून, शेतकऱ्यांनी Google Play Store वर उपलब्ध असलेले ई-पीक पाहणी ॲप डाउनलोड करून ते आपल्या अँड्रॉईड स्मार्ट मोबाईलमध्ये इन्स्टॉल करणे आवश्यक आहे. यापूर्वी शेतकऱ्यांची पिक पाहणी ग्राम महसूल अधिकारी यांच्या मार्फत करण्यात येत होती. मात्र या प्रक्रियेत होणारा वेळ, अडचणी आणि गैरसोयी लक्षात घेऊन शासनाने ही सुविधा थेट शेतकऱ्यांच्या हातात दिली आहे.ई-पीक पाहणी करताना शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतात प्रत्यक्ष जाऊन अचूक गट नंबर नोंदवावा तसेच मुख्य पिकाचे छायाचित्र शेताच्या शक्य तितक्या आतमध्ये जाऊन काढावे, जेणेकरून पिकांची




नोंद अचूकपणे सातबारावर होईल. पिककर्ज, पीकविमा, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई तसेच बँक कर्जासाठी लागणारा पिकपेरा यासंदर्भातील अडचणी या ई-पीक पाहणी मोहिमेमुळे दूर होणार आहेत.ई-पीक पाहणी नोंदविताना शेतकऱ्यांना काही अडचण आल्यास त्यांनी आपल्या गावातील संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंद पूर्ण करणे आवश्यक आहे.तरी महसूल प्रशासनाच्या वतीने निफाड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत आपल्या अँड्रॉईड स्मार्ट मोबाईलवरून ई-पीक पाहणी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी पारदर्शक, सोपी आणि वेळ वाचविणारी ठरणार असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# कामोठ्यात ‘खेळ पैठणीचा’ उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## ■ राजमाता अहिल्याबाई सेवा संस्थेचा हळदी–कुंकू समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** राजमाता अहिल्याबाई सेवा संस्था, कामोठे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हळदी–कुंकू समारंभासह ‘खेळ पैठणीचा’ या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांचा उत्साह, भारतीय संस्कृतीचे जतन आणि सामाजिक ऐक्य यांचे सुंदर दर्शन या कार्यक्रमातून घडले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून आयोजकांचे विशेष कौतुक केले. महिलांना एकत्र आणणारे, त्यांच्यात आत्मविश्वास व सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेच्या सभासद विद्याताई तामखेडे व नाना मगदूम यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून आभार व्यक्त केले.







प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने नेहमीच महिलांचा सन्मान राखला असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली आहेत. विद्याताई तामखेडे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांना पक्षश्रेष्ठी योग्य सन्मान देतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. उमेदवारी देण्याचा अधिकार पक्ष नेतृत्वाकडे असून योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

कामोठ्यात आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर महिला व नागरिकांची उपस्थिती लाभली. समाजाच्या एकत्रीकरणासाठी आणि महिलांच्या सबलीकरणासाठी भाजपचे पदाधिकारी वर्षभर विविध उपक्रम राबवत असतात. अशा कार्यक्रमांमधून महिलांना ऊर्जा, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभागाची प्रेरणा मिळते, असे मतही आमदार ठाकूर यांनी व्यक्त केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविण्यात येत असून, त्याच धर्तीवर भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तळागाळात काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह कामोठे शहराध्यक्ष विकास घरत, माजी अध्यक्ष व ज्येष्ठ नेते रवी जोशी, युवा नेते हॅपी सिंग, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, के. के. म्हात्रे, राजेश म्हात्रे, सरस्वती कथारा, तेजस जाधव, हर्षवर्धन पाटील, छाबा फाउंडेशनचे दामोदर चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब बुधे, कार्याध्यक्ष गणेश बेरगळ, उपाध्यक्ष पांडुरंग यमगर, सचिव कैलास सरगर, खजिनदार अशोक माने, सहसचिव अर्जुन गावडे, विजय सरगर, नानासाहेब बुधे, किसन यमगर, माणिक सरगर, रावसाहेब कोळेकर, एकनाथ हुबाळे, विलास पुकळे, सतीश सरगर, उल्हास धायगुडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

---

# ज्येष्ठांना आत्मविश्वासाचे जगण्याचा आधार मिळावा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** म्हातारपण हे कधीही एकाकी किंवा दडपून टाकणारे असू नये. प्रत्येक ज्येष्ठ माणूस समजूतदार, विश्वासाहर्य आणि सहज मिळणारी देखभाल मिळवण्यास पात्र आहे.

त्यांना आत्मविश्वासाने आणि स्वतंत्रपणे जगण्यास आधार मिळावा असे मत जेन एस लाईफ च्या संस्थापक मीनाक्षी मेनन यांनी व्यक्त केले.

भारताचे पहिले ज्येष्ठांसाठी लाइफस्टाइल ॲप जेन एस लाईफ ने आयुष्याच्या संध्याकाळच्या टप्प्यावर असणाऱ्यांना उपलब्ध करून दिले आहे.

आरोग्य आणि आनंददायी नेटवर्क संस्थेने या माध्यमातून उभे केले असल्याने ज्येष्ठ मंडळी मेट्रोपोलिस, टाटा , शुगर फिट, अन्वया, रेड हेल्थ आणि फार्मा ईझी सारख्या आरोग्य सोबतीवर विश्वास ठेवू शकतात. आजाराच्या निदानापासून ते दिर्घ काळ असणाऱ्या आजारांवर सुविधा व भावनिक आधाराच्या यामधून ज्येष्ठांना मिळणार आहेत.

# कुऱ्हा येथे 26 डिसेंबर रोजी पंचशील प्रबोधन गायन महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यूवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिंह. ठाकुर :** "जागृती युवा मंच यांच्या पुढाकर - नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन"कुऱ्हा. येथे जागृती युवा मंच यांच्या पुढाकारातून भव्य व अर्थपूर्ण पंचशील प्रबोधन गायन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव शुक्रवार, दि. 26 डिसेंबर 2025 रोजी सायंकाळी ठीक 6 वाजता, रा. कुऱ्हा येथे पार पडणार असून बुलढाणा येथील सुप्रसिद्ध गायक.शाहीर दिनकराव साळवे, आणि त्यांची टीम

यांचा सामाजिक-सांस्कृतिक महोत्सवात सुप्रसिद्ध गायक-शाहीर दिनकराव साळवे व त्यांची टीम सहभागी होणार असून, त्यांच्या सशक्त आवाजातून पंचशील, सामाजिक समता व मानवमूल्यांचा जागर करण्यात येणार आहे. कार्यक्रमात पंचशील प्रबोधन गायनासह महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित प्रबोधनात्मक, सांस्कृतिक व प्रेरणादायी गीतांचे प्रभावी सादरीकरण होणार आहे.

“जागृतीचा विस्तव कधीही विझू देऊ नका” हा विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार केंद्रस्थानी ठेवून, स्वाभिमान, समानता, सामाजिक न्याय व मानवतेचा मार्ग समाजासमोर उजळवण्याचा संकल्प या महोत्सवातून व्यक्त करण्यात येणार आहे. युवकांमध्ये



सामाजिक भान निर्माण करणे, अन्यायाविरुद्ध विचारांची मशाल पेटवणे आणि पंचशील प्रबोधनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. तरी जिल्ह्यातील, तालुक्यातील तसेच परिसरातील सर्व बौद्ध उपासक-उपासिका, युवक-युवती व सर्व नागरिकांनी या पंचशील प्रबोधन गायन महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक जागृतीच्या या विचारयज्ञात सहभागी व्हावे, असे आवाहन जागृती युवा मंच यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी प्रा. सतिश जुमडे (मो. 7499534133) यांच्याशी संपर्क साधावा. सदर कार्यक्रम चे आयोजक प्रा.सतिश जुमडे, सुखदेव जुमडे,शामराव कोळी,दत्तराव जुमडे,सुदाम जुमडे, भगवान जाधव, भीमराव कोळी,. बबन बनकर,उद्धव कांबळे, संतोष जुमडे,कुमार बनकर, विनोद बनकर,बळीराम कांबळे, रमेश जुमडे सुनील बनकर,आकाश बनकर,लखन बनकर, विनोद मगरे,परसराम सरकटे, राजू जुमडे,वैभव जाधव, हार्दिक कांबळे. व समस्त बौद्ध उपासक तथा उपाशी व समस्त गावकरी मंडळी कुऱ्हा यांच्या वतीने करण्यात आले.

---

# मुदखेड नगर परिषद निवडणूक निकाल जाहीर; भाजपाचा स्पष्ट बहुमतासह सत्ता काबीज

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** मुदखेड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत नगर परिषदेत सत्ता प्रस्थापित केली आहे. नगराध्यक्षपदी भाजपाच्या सौ. विश्रातीताई माधव कदम यांची निवड झाली आहे.

एकूण २१ जागांच्या नगर परिषदेत भाजपाने १४ नगरसेवक व नगराध्यक्ष पदासह एकूण १५ जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेस पक्षाला ४ जागा, तर एमआयएम पक्षाला २ जागा मिळाल्या आहेत.

प्रभागनिहाय विजयी उमेदवार :

प्रभाग १ (अ) मोडवान सविता श्रीनिवास (भाजपा),प्रभाग १ (ब) उपेंद्र लक्ष्मण देवदे (भाजपा),प्रभाग २ (अ) चौदंते अविनाश नागोराव (काँग्रेस),प्रभाग २ (ब) पठाण नजीमा खातुन बंदेअली (काँग्रेस),

प्रभाग ३ (अ) पांचाळ प्रेमला गोपीनाथ (भाजपा),प्रभाग ३ (ब) शेख अब्दुल शेख खदीर (काँग्रेस),प्रभाग ४ (अ) चौदंते रेखा नितिन (भाजपा),प्रभाग ४ (ब) चंदे शाम टिकाराम (भाजपा),प्रभाग ५ (अ) बागवान शमिम सुलताना म. नईत (एमआयएम),प्रभाग ५ (ब) मोमीन अमीर हमजा अ. हमीद (एमआयएम),प्रभाग ६ (अ) बल्फेवाड शोमा ओमप्रकाश (भाजपा),प्रभाग ६ (ब) शेटे सुनील जगन्नाथ (भाजपा),प्रभाग ७ (अ) बोकेफोड गोदावरी पांडूरंग (काँग्रेस),प्रभाग ७ (ब) कुरेशी अ. सत्तार सादल्ला (भाजपा),प्रभाग ८ (अ) चव्हाण रामसिंग भिमराव (भाजपा),प्रभाग ८ (ब) सोनटक्के निकिता संजय (भाजपा),प्रभाग ९ (अ) चमकुरे शांताबाई महादू (भाजपा),प्रभाग ९ (ब) मो. इमरान शेख मैनोद्दीन (भाजपा),प्रभाग १० (अ) आऊलवार संजय दगडू (भाजपा),

प्रभाग १० (ब) अतिया परविन अ. सलाम (भाजपा).

**पक्षनिहाय निकाल :**

भाजपा – १४ + नगराध्यक्ष (एकूण १५),

काँग्रेस – ४,

एमआयएम – २.

भाजपाच्या या विजयामुळे शहरात आनंदाचे वातावरण असून, नव्या नगर परिषदेच्या माध्यमातून शहर विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# सिल्लोडमध्ये कापसाची होळी ; शिवसेनेचे जोरदार 'रास्ता रोको' भ्रष्ट CCI अधिकाऱ्यांची SIT चौकशी करा : आमदार अब्दुल सत्तार यांची आक्रमक मागणी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** शेतकऱ्यांच्या कापसाला शासकीय हमीभाव मिळावा आणि सिल्लोड तालुका जिनिंग प्रेसिंग येथे तातडीने सीसीआय (CCI) केंद्र सुरू करण्यात यावे, या मागणीसाठी आज शिवसेनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आक्रमक 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी आंदोलनात कापूस पेटवून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला. या आंदोलनामुळे छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील वाहतूक तासनतास ठप्प झाली होती.

या आंदोलनात माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार स्वतः सहभागी झाले होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, "विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊनही अद्याप सीसीआय केंद्र सुरू झालेले नाही. यामागे सीसीआयच्या अधिकाऱ्यांचे भ्रष्ट धोरण असून, या सर्व प्रकरणाची 'एसआयटी' (SIT) मार्फत चौकशी करण्यात यावी." दलाल हटाव, शेतकरी वाचवा आणि कापसाला योग्य भाव द्या, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.






**प्रमुख मागण्या आणि इशारा:**

सिल्लोड तालुका सहकारी जिनिंगमध्ये तातडीने हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करा.

शेतकऱ्यांच्या पीकविम्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावा.

मागण्या मान्य न झाल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा.

आंदोलनस्थळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांनी भेट देऊन निवेदन स्वीकारले व मागण्या शासनाकडे पाठवण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनात नवनिर्वाचित नगराध्यक्ष अब्दुल समीर, जिल्हा बँक अध्यक्ष अर्जुन पा. गाढे, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, शिवसेनेचे जिल्हा व तालुका स्तरावरील नेते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

---

# रेवदंड्यात १० वर्षे संडास विषारी धुके; ग्रामस्थांचा जीव धोक्यात, फडणवीस सरकार गाफील!

## सांडपाणी विषारी धुके; नागरिक, शाळा, मैदान, पर्यटक जोखमीत

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/ अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा ग्रामपंचायतीच्या हृदयस्थानी असलेल्या हरेश्वर मैदान आणि नाना-नानी पार्काजवळील अनधिकृत बिल्डिंगमधील संडास टाकीमधून १० वर्षांपासून सांडपाणी उन्मळून वाहत आहे. यामुळे प्राथमिक मराठी शाळेतील लहान मुलं, क्रिकेटप्रेमी खेळाडू, स्थानिक रहिवासी आणि समुद्रकिनारी येणारे पर्यटक दुर्गंधीयुक्त विषारी पाण्यात बुडाले आहेत. ग्रामस्थांच्या आरोग्याला, जीविताला आणि पर्यावरणाला घातक धोका निर्माण झाला असताना ग्रामपंचायत, महसूल यंत्रणा आणि जिल्हा प्रशासन मात्र गाफील आहे का? की आर्थिक देवाणघेवाणीच्या जाळ्यात अडकलेली आहे ही यंत्रणा? असा संताप ग्रामस्थांमध्ये उसळत आहे.मारुती आळीतील ही अनधिकृत बिल्डिंग सुमारे १० वर्षांपूर्वी बेकायदेशीरपणे उभी राहिली. तिच्या संडास टाकीमधून सांडपाणी रस्त्यावर, हरेश्वर मैदानावर आणि शाळेजवळ पसरते. क्रिकेट खेळताना खेळाडूंना दुर्गंधीयुक्त पाण्यात हात टाकावा लागतो, तर लहान मुलं शाळेत जाण्यासाठी रुमाल ठेवून चालावे लागतात. "ग्राउंडवर नाचणं म्हणजे संडास पाण्यातूनच नाचणं!" असा थेट सवाल उपस्थित करत ग्रामस्थ म्हणतात, "हे पाणी पित असलेल्या शुद्ध पाण्याच्या प्रकल्पाच्या अगदी शेजारी वाहतंय. यातून डेंग्यू, उलटी, मळमळ, गॅस्ट्रो इन्फेक्शन होण्याची शक्यता आहे. व्हायरस, जीवाणू, परजीवी यामुळे मानव, प्राणी आणि जैवविविधतेला धोका!"ग्रामस्थांनी गेल्या कित्येक वर्षांत रेवदंडा ग्रामपंचायत, रायगड जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक तक्रारी केल्या. पण कारवाई शून्य! "ग्रामसभांमध्ये हा विषय उपस्थित होतो, पण तोडगा काढला जात नाही. अनधिकृत बिल्डिंगला परवानगी कोणी दिली? ग्रामपंचायत, तहसीलदार, प्रांताधिकारी की जिल्हाधिकारी? पैशाच्या पिशवीत गुप्त व्यवहार लपलेले आहेत का?" असा प्रश्न विचारत ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. अलिबाग तालुका महसूल,



आरोग्य अधिकारी आणि जिल्हा आरोग्य यंत्रणा का गप्प? नवीन बिल्डिंगही उभी राहत असून तिच्या सांडपाण्याची व्यवस्था काय? शोषखड्डा, टाकीची क्षमता ग्रामसभेत लेखी खुलासा करा, अशी मागणी जोर धरत आहे. शासनाच्या नाकर्तेपणावर टीका: ग्रामस्थ आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्य मंत्री डॉ. प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, ग्रामविकास सचिव एकनाथ डावले आणि आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक यांच्याकडे ध्यास लावला आहे. "जीवितहानी झाली तर जबाबदारी कोण घेणार? लहान मुलांचं, ग्रामस्थांचं आरोग्य धोक्यात आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून अनधिकृत बिल्डिंगवर कारवाई करावी, सांडपाणी थांबवावं अन्यथा जनआंदोलन उभं राहील!" असा इशाराही दिला आहे. रेवदंडा ग्रामस्थांच्या या लढ्याकडे आता संपूर्ण रायगडचं लक्ष लागलंय.

# हसतमुख ‘ताई’ हरपल्या नाशिक जिल्ह्यात अंगणवाडीचा मान उंचावणारी सेविका अपघातात ठार

**सर्वांशी मनमिळाऊ, कर्तव्यदक्ष नावलौकिक करणारी सेविका गायत्री ताई काळाच्या पडद्याआड**

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** लासलगाव–टाकळी बायपास रोडवर झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या गायत्री हेमंत घायाळ (वय ३५, रा. विष्णूनगर (पाबळवाडी ) ता. निफाड या केवळ एक अपघातातील बळी नव्हत्या, तर त्या गावाची “ताई”, मुलांची “आई” आणि अंगणवाडी व्यवस्थेचा अभिमान होत्या.

सर्वांशी हसतमुख, प्रेमळ बोलणाऱ्या, मदतीसाठी



नेहमी पुढे असलेल्या गायत्री हेमंत घायाळ यांनी आपल्या कार्यकाळात अंगणवाडी सेविकेच्या भूमिकेला केवळ नोकरी न मानता सामाजिक बांधिलकीचे रूप दिले होते. लहान मुलांचे संगोपन, गरोदर माता व स्तनदा मातांची काळजी, आरोग्यविषयक जनजागृती यासाठी त्या कायम झटत असत.

त्यांच्या प्रामाणिक, शिस्तबद्ध व नाविन्यपूर्ण कामामुळे संबंधित अंगणवाडीने नाशिक जिल्ह्यात उल्लेखनीय क्रमांक (नंबर) मिळवून दिला होता. हा सन्मान केवळ आकड्यापुरता मर्यादित नव्हता, तर त्यांच्या मेहनतीची पावती होती

आज मात्र तीच सेविका काळाच्या पडद्याआड गेल्याने पाबळवाडी परिसरात शोककळा पसरली आहे. “ताई आता येणार नाहीत” या जाणिवेने अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांचे डोळे पाणावले असून, गावकऱ्यांचे मन सुन्न झाले आहे.

अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची बातमी समजताच संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. कर्तव्यदक्ष सेविका, प्रेमळ व्यक्तिमत्त्व आणि समाजाशी नाळ जुळवणारी एक संवेदनशील कार्यकर्ता हरपल्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.

# एरंडोल न.पा.निवडणूकीत शिंदे शिवसेना पक्षाची सरशी, भाजपचे डॉ.नरेंद्र ठाकूर यांचा दणदणीत विजय......!

**दैनिक युवक आधार**

**स्वप्नील पाटील :** एरंडोल येथील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी म्हसावद रस्त्यालगतच्या इनडोअर स्टेडियम मध्ये २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित करण्यात आला.नगराध्यक्ष पदी भाजपाचे डॉ. नरेंद्र धुडकू ठाकूर यांनी ९२९४ मताधिक्य घेत दणदणीत विजय मिळविला.विशेष हे की राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट नगराध्यक्ष उमेदवार गायत्री दिपक पाटील या दुसऱ्या क्रमांकावर राहील्या.तर उबाठाचे रघुनाथ राजाराम ठाकूर हे तिसऱ्या क्रमांकावर राहीले.उर्वरित दोन अपक्ष उमेदवार दर्शना ठाकूर व भोलानाथ महाले यांना ४ अंकी मताचा आकडा गाठता आला नाही.शिंदे शिवसेना पक्षाने आपली जादू दाखवत नगरसेवक पदाच्या ११ जागा पटकावल्या तर भाजपाने पुर्वीप्रमाणेच ४ जागा राखण्यात यश मिळाले.तर प्रभाग क्रमांक ११ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने तिन्ही जागा काबिज केल्या. मतदारांनी अपक्षांना देखील मोठ्या प्रमाणात कौल देऊन ५ अपक्ष उमेदवारांच्या कपाळाला विजयी गुलाल लावला.




सकाळी १० वाजता मतमोजणीस प्रारंभ होऊन सर्व २२ नगरसेवक व नगराध्यक्ष पदाचा निकाल दुपारी १ वाजेच्या सुमारास घोषित करण्यात आला.मतमोजणीच्या वेळी उमेदवारांचे समर्थक व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती.निकाल जाहीर होताच समर्थक व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व गुलालाची उधळण करून जल्लोष करण्यात आला. प्रारंभी २२ नगरसेवक पदांचे निकाल घोषित झाल्यावर शेवटी नगराध्यक्ष पदाचा निकाल घोषित करण्यात आला. मतमोजणीच्या वेळी पोलिस निरीक्षक निलेश गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रदीप पाटील, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी अमोल बागुल यांनी काम पाहिले.विजयी उमेदवारांनी आपल्या समर्थक व कार्यकर्त्यांसह सवाद्य विजयी मिरवणूक काढून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या.विजयी उमेदवारांचे ठिकठिकाणी औक्षण करण्यात आले.जवळपास ९ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर या निवडणुक निकालाने आता खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींच्या हाती नगरपालिकेची सत्ता सोपवली जाणार असल्यामुळे मतदारांमध्ये व विजयी उमेदवारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

एरंडोल नगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५

**लोकनियुक्त नगराध्यक्ष निकाल**

१) ठाकूर नरेंद्र धुडकू, भाजपा, मिळालेली एकूण मते १४,४८०

२) पाटील गायत्री दिपक, राष्ट्रवादी काँग्रेस,मिळालेली एकूण मते ५१६३

३) ठाकूर रघूनाथ राजाराम, शिवसेना उबाठा,मिळालेली मते २,४६२

४) ठाकूर दर्शना विजयकुमार,अपक्ष,मिळालेली मते ४४९

५) महाले भोलानाथ नामदेव,अपक्ष,मिळालेली मते ५१३

लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. नरेंद्र धुडकू ठाकूर हे ९२९४ मताधिक्याने विजयी.

विजयी नगरसेवक,पक्ष व मिळालेली मते पुढीलप्रमाणे.

प्रभाग क्रमांक १अ
कल्पना मनोज पाटील, शिंदे शिवसेना (१४४६ मते)

प्रभाग क्रमांक १ब
रविंद्र संतोष महाजन,अपक्ष ( ११४१ मते)

प्रभाग क्रमांक २ अ
डॉ.गितांजली नरेंद्र ठाकूर, भाजपा ( १०८० मते)

प्रभाग क्रमांक २ब
अमोल किशोर तंबोली,अपक्ष ( ७७४ मते)

प्रभाग क्रमांक ३ अ
छाया आनंद दाभाडे, शिंदे शिवसेना ( ११४० मते)

प्रभाग क्रमांक ३ब
कमल गोपाल पाटील, शिंदे शिवसेना ( १०१२ मते)

प्रभाग क्रमांक ४अ
मयूर दिलीप महाजन,अपक्ष(१३६६ मते)

प्रभाग क्रमांक ४ब
सुनिता रूपेश माळी, शिंदे शिवसेना( १४४६ मते)

प्रभाग क्रमांक ५अ
सत्यभामाबाई माधव पाटील, शिंदे शिवसेना (१११६ मते)

प्रभाग क्रमांक ५ब
प्रा.मनोज नथ्थू पाटील, शिंदे शिवसेना(१२४५ मते)

प्रभाग क्रमांक ६अ
अनिल केशव महाजन, शिंदे शिवसेना ( ८५१ मते)

प्रभाग क्रमांक ६ब
आरती अतुल महाजन,अपक्ष(६७३ मते)

प्रभाग क्रमांक ७ ब
कृष्णा प्रल्हाद ओतारी,अपक्ष(१३५४ मते)

प्रभाग क्रमांक ८अ
भारती मनोज गुर्जर, भाजपा ( ११०१ मते)

प्रभाग क्रमांक ८ब
पौर्णिमा महेश देवरे, शिंदे शिवसेना(८५७ मते)

प्रभाग क्रमांक ९अ
नितेश कैलास चौधरी, भाजपा (१०६० मते)

प्रभाग क्रमांक ९ब
जिजाबाई वसंत पाटील, भाजपा (११५२ मते)

प्रभाग क्रमांक १०अ
मनकरनाबाई चैत्राम चौधरी, शिवसेना (१३८१ मते)

प्रभाग क्रमांक १०ब
नय्यमखां दलशेरखां पठाण, शिवसेना ( ११९७ मते)

प्रभाग क्रमांक ११ अ
नजमाबी सईद कागजी राष्ट्रवादी काँग्रेस (२३०४ मते)

प्रभाग क्रमांक ११ब
शबानाबी नुरूद्दीन सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेस (२२२५ मते)

प्रभाग क्रमांक ११क
इम्रानअली जाफरअली सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेस(२३०५ मते)

# SCERT महाराष्ट्राच्या तबला सोलोवादन स्पर्धेत परभणीच्या शिक्षकाची राज्यस्तरावर झेप

## छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड; लहुदास मुळीक यांची राज्यस्तरासाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद), महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने राज्यातील शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ४३ प्रकारच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आयोजित तालवाद्य 'तबला – सोलोवादन' या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागातून उल्लेखनीय कामगिरी झाली आहे.या विभागातील विविध जिल्ह्यांतून निवड होऊन जवळपास ३० स्पर्धक विभागीय स्तरावर सहभागी झाले होते. त्यामधून



श्री. लहुदास माणिक मुळीक, प्रा. पदवीधर शिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा लाडनंद्रा, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, राज्यस्तरासाठी निवड झालेल्या एकूण पाच संगीत वादकांमध्ये त्यांचा समावेश आहे.या प्रसंगी स्पर्धा समन्वयक डॉ. वैशाली जहागीरदार (नोडल अधिकारी), डॉ. प्रकाश मांटे, तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या माजी उपसंचालिका सान्वी देशमुख मॅडम, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, केंद्रप्रमुख श्री. गजानन वाघमारे, गटशिक्षणाधिकारी (सेलू), तसेच आदर्श शिक्षक श्री. वि. भा. साळुंके सर, बाबासाहेब मुळीक सर (मा. स्वीकृत सदस्य, जिल्हा परिषद, बीड), प्रल्हाद मुळीक (सरपंच, घाटा) आदी मान्यवरांनी श्री. मुळीक यांचे कौतुक करून राज्यस्तरासाठी शुभेच्छा दिल्या.

ही निवड शिक्षकांच्या कलागुणांना मिळालेली दाद असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# सौ संतोषी संपत बांगर यांच्या सहकार्याने सेवा सहयोग फाउंडेशन मार्फत सह्याद्री विद्यामंदिर मधील विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे) :** सौ संतोषी संपत बांगर यांच्या सहकार्याने दि.१९/१२/२०२५ रोजी सेवा सहयोग फाउंडेशन मार्फत सह्याद्री विद्यामंदिर (भांडुप) येथील शाळेतील गरजू ,होतकरु, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना १०० स्कूल कीटचे मोफत वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे,पटसंख्या वाढावी,गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून सेवासहयोग फाउंडेशन तर्फे प्रतिवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील जवळ जवळ ७०० शाळांमध्ये ७५हजार विद्यार्थ्यांना स्कूल कीटचे वाटप करण्यात येते. यावर्षी सह्याद्री विद्यामंदिर मधील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना १०० स्कूलकिटचे वाटप करण्यात आले. हे वाटप सह्याद्री विद्या प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष सन्मा. श्री जगन्नाथ अंबरे साहेब,सहचिटणीस सन्मा. श्री रवींद्र भास्कर राणे साहेब व संस्थेचे



विश्वस्त वेल्फेअर फंडाचे अध्यक्ष सन्मा. श्री अरुण राणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले .याचवेळी एस विभागीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील बक्षीस देऊन त्यांचे कौतुकही करण्यात आले .

याचबरोबर कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीम. गीतांजली पाटील मॅडम यांनी संस्थेचे पदाधिकारी ,शिक्षक वृंद ,पालक व विद्यार्थी तसेच ही मदत मिळवून देणाऱ्या सौ.संतोषी बांगर यांचे आभार व्यक्त केले. तसेच सौ.संतोषी संपत बांगर यांनी सेवा सहयोग फाऊंडेशनचे सदस्य मान. श्री. विशाल देसाई यांचे या मदतीबद्दल आभार व्यक्त केले.

# नगरपालिका-नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेसचे ४१ नगराध्यक्ष व १००६ नगरसेवक विजयी: हर्षवर्धन सपकाळ

## अत्यंत विपरित परिस्थितीतले हे यश महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारे

## पैशांपेक्षा जनतेचा विश्वास आणि सत्तेपेक्षा विचारधारा महत्त्वाची असते हे मतदारांनी दाखवून दिले.

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील २८८ नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत अत्यंत विपरित परिस्थितीत काँग्रेस पक्षाने विचारधारेच्या ताकदीवर लढा दिला. कोणतीही आर्थिक रसद नसताना, केवळ लोकशाही मूल्यांवर ठाम विश्वास ठेवून सत्ताधा-यांच्या धनशक्तीविरोधात संघर्ष केला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीच्या बळावर या निवडणुकांत काँग्रेसचे ४१ नगराध्यक्ष आणि १,००६ नगरसेवक राज्यातील मतदारांनी निवडून दिले. या निकालावरून पैशांपेक्षा विश्वास मोठा असतो आणि सत्तेपेक्षा विचार महत्त्वाचा असतो, हे पुन्हा दिसून आले असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस



कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, निवडणुकीत विजय पराजय होत असतात, काँग्रेस पक्षाने अनेक उन्हाळे पावसाळे पाहिले आहेत. पराभवाने खचून न जाता मोठ्या उत्साहाने लढण्याची ताकद, ऊर्जा व दृढ निश्चिय काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आहे. कार्यकर्त्यांचा हा विश्वासच पक्ष संघटनेसाठी महत्वाचा असतो. याचा प्रत्यय या निवडणुकीत आला काँग्रेस पक्षाचे नागपूर विभागात १४ नगराध्यक्ष व ३४० नगरसेवक, अमरावती विभागात ९ नगराध्यक्ष व २३६ नगरसेवक, मराठवाड्यात ५ नगराध्यक्ष व १५६ नगरसेवक, पश्चिम महाराष्ट्रात ३ नगराध्यक्ष आणि ४७ नगरसेवक, उत्तर महाराष्ट्रात २ नगराध्यक्ष व ४७ नगरसेवक आणि कोकण विभागात १ नगराध्यक्ष आणि २६ नगरसेवक निवडणूक ले आहेत. यासोबत काँग्रेस समर्थक स्थानिक आघाड्यांचे ७ नगराध्यक्ष व १५४ नगरसेवक निवडून आले आहेत.

काँग्रेस संपली म्हणणाऱ्यांना या निकालाने चोख उत्तर दिले आहे. काँग्रेसची विचारधारा हीच देशाला तारणारी आहे, जाती धर्माच्या नावावर सामाजिक सलोखा बिघडवून राजकीय पोळी भाजणाऱ्या व पैशाच्या जोरावर सर्व निवडणूका जिंकता येऊ शकतात असा समज जनतेने खोडून काढला आहे.

भाजपा व एकनाथ शिंदे यांच्या पक्षाने पैशाचा प्रचंड वापर करून, प्रशासन व निवडणूक आयोगाच्या मदतीने विजय मिळवला असला तरी जनतेच्या मनात आजही काँग्रेस आहे व पुढेही ती कायम राहिल. ही विचाराची लढाई आहे आणि काँग्रेस विचारधारेपासून तसूभरही दूर गेलेला नाही. या संघर्षात साथ देणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे, प्रत्येक कार्यकर्त्याचे मनापासून अभिनंदन आणि काँग्रेस पक्षावर विश्वास दाखवणाऱ्या महाराष्ट्राच्या जनतेचे मी मन:पूर्वक आभार मानतो. नगरपालिका निवडणुकीत मिळालेला विजय हा महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी ऊर्जा देणारा आहे. महाभ्रष्ट भाजपा महायुतीपासून महाराष्ट्र वाचविण्याचा काँग्रेसचा हा लढा अखंडपणे सुरूच राहील असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.



**कोंडले येथील रविंद्र पाटील यांची कन्या आकांक्षा रविंद्र पाटील हिने पनवेल केशवजी वीरजी कन्या विद्यालय पनवेल भेटकार्ड स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे**

( दैनिक युवक आधार )